मंगळवार, ८ मार्च २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक २३०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

महिला दिन फक्त ८ मार्चलाच साजरा करायचा का? -वाप/२

तोतया व्यक्ती उभी करून माणगावमध्ये जमिनीची विक्री/५

एमसीसी संघ महापौर चषकाचा मानकरी/६

## ओबीसी आरक्षण विधेयक विधानसभेत मंजूर



**मुंबई** : भाजपच्या मागणीनुसार राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान ओबीसी आरक्षणाचे विधेयक सोमवारी (दि. ७) विधानसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आले. यामुळे मध्य प्रदेश पॅटर्नप्रमाणे निवडणूक घेण्याचे अधिकार वगळता इतर अधिकार राज्य सरकारकडे आले आहेत. ओबीसी विधेयक मंजुरीमुळे प्रभाग रचना, निवडणुकीच्या तारखा ठरवण्याचे अधिकार सरकारकडे असणार आहेत. ओबीसी आरक्षणाची भूमिका स्पष्ट होईपर्यंत राज्यातील निवडणुका घेऊ नयेत, अशी मागणी माजी मुख्यमंत्री आणि विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्याचप्रमाणे या संदर्भात मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर विधेयक आणा. आम्ही त्यास पाठिंबा देऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले होते.

*एकविसाव्या युगात महिलावर्गाने स्वकर्तृत्वाच्या जोरावर आपली वेगळी अशी ओळख निर्माण केली आहे. चूल आणि मूल सांभाळून ती अंतराळातही जाऊन पोहचली. समाजात अनेक महिला चांगले काम करीत असतात, परंतु यातील काही प्रसिद्धीपासून दूर असतात. अशा परिचित-अपरिचित महिलांचे कार्य 'रामप्रहर'च्या माध्यमातून आज जागतिक महिला दिनानिमित्त वाचकांसमोर आणताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. त्यांनी यापुढेही उत्तुंग झेप घ्यावी या महिला दिनानिमित्त त्यांना शुभेच्छा!*

(महिला दिन विशेष माहितीपट पान ३, ४ वर..)




## एकविसाव्या युगातील महिलांची भरारी..!

### सीताताई पाटील
**(उपमहापौर, पनवेल मनपा)**



भाजीवाली ते पनवेलची उपमहापौर हा प्रवास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आशीर्वाद, जनतेचे प्रेम आणि आमदार प्रशांत ठाकूर व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यामुळेच शक्य झाल्याचे पनवेलच्या उपमहापौर सीताताई सदानंद पाटील यांनी सांगितले. मोठा खांदामध्ये जन्मलेल्या सीताताईंना समाजकार्याची पहिल्यापासून आवड होती. लग्नानंतर त्या खांदा कॉलनीत भाजी व दुधाचा व्यवसाय करू लागल्या. त्या ठिकाणी येणाऱ्या महिला त्यांच्या समस्या सांगत. या समस्या सीताताई सोडवित असल्याने महिलांना न्याय मिळू लागला. **(पान ३ वर..)**

### संध्या भडसावळे-देवस्थळे
**(प्रशिक्षिका, नेरळ)**



स्वातंत्र्य चळवळ भिनलेल्या कुटुंबात जन्म घेतलेली व्यक्ती आपल्यावर जबाबदारी आल्यावर गप्प बसूच शकत नाही याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे नेरळमधील संध्या भडसावळे-देवस्थळे. स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ भडसावळे यांची कन्या असलेल्या संध्या यांनी समाजसेवेच्या आवडीतून असंख्य महिलांचे संसार उभे केले आहेत. एमएस्सीसारखे उच्च शिक्षण घेत वडिलांच्या छत्रात वाढलेल्या संध्याताई पतीच्या आकस्मिक मृत्यूनंतर एकुलत्या एक डॉक्टर कन्येला संसाराला लावून गोरगरीब महिलांना रोजगार निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण देत आहेत. **(पान ४ वर..)**

### ठमाताई पवार
**(सामाजिक कार्यकर्त्या, कर्जत)**



कर्जतमधील ठमाताई पवार एक आदिवासी अशिक्षित महिला. जांभिवली येथे वनवासी आश्रम सुरू झाला तेव्हा त्या तेथील आदिवासी मुलांना भाकरी करून देण्यासाठी जात असत. त्यांना त्या वेळी आपल्या आदिवासी समाजाच्या दुर्दशेची स्थिती समजली. आदिवासी पुरुषांबरोबर महिलासुद्धा व्यसनाधीन होत्या. मजुरीतून मिळालेला पैसा व्यसनासाठी संपत असल्याने कुटुंबाची हेळसांड होत असे तसेच ही सर्व कुटुंबे अंधश्रद्धेच्या आहारी जात. हे सारे ठमाताईंनी पाहिले आणि समाजासाठी काहीतरी केले पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याचे ठरविले. **(पान ४ वर..)**

### रेखा मोरे
**(उद्योजिका, अलिबाग)**



अलिबागच्या रेखा मोरे यांनी १९८० साली चार मुलींना घेऊन घरच्या अंगणात टेलरिंग प्रशिक्षण वर्ग सुरू केला. प्रशिक्षणाला येणाऱ्या महिला-मुलींची वाढती संख्या पाहून ठिकरूळ नाक्यावर भाड्याच्या जागेत हा व्यवसाय सुरू झाला. प्रशिक्षणाबरोबरच शिलाईचे काम वाढू लागले. कालांतराने भाड्याच्या जागेतून स्वतःच्या मालकीचे दुकान घेतले. आज गेली ४२ वर्षे हा गृहोद्योग सुरू आहे. पुढे प्रशिक्षित मुलींनाच काम देऊन त्यांना यातून अर्थप्राप्तीचा मार्ग दाखविण्यात आला. **(पान ४ वर..)**

### प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी

# १७ मार्चला दास्तान फाट्यावर रास्ता रोको

## सर्वपक्षीय कृती समिती सिडकोचा वर्धापन दिन काळा दिवस म्हणून पाळणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सिडकोच्या ५२व्या वर्धापन दिनी म्हणजेच येत्या १७ मार्चला दास्तान फाटा येथे रास्ता रोको करून काळा दिवस पाळण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या आयोजनासंदर्भात आगरी समाज मंडळाच्या सभागृहात लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची बैठक रविवारी (दि. ६) झाली. समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील आणि उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली.

मुंबईवरील वाढता ताण कमी करण्यासाठी पनवेल-उरण-बेलापूर पट्टीतील ९५ गावांतील गावकऱ्यांना १००% भूमिहीन करीत नवी मुंबई वसविण्यासाठी सिडकोची स्थापना झाली. या ९५ गावांतील प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांना प्रलंबित न्याय्य हक्कांसाठी ५२ वर्षे उलटली तरी अद्यापही संघर्ष करावा लागत आहे. दुर्दैव म्हणजे ज्या जासईजवळील दास्तान फाटा येथे सन १९८४मध्ये सिडकोविरोधात प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वात लढ्याचे रणशिंग फुंकले गेले, त्या जासई पट्ट्यातील शेतकऱ्यांना अद्यापही साडेबारा टक्के विकसित भूखंड मिळालेले नाहीत. **(पान २ वर..)**



### प्रकल्पग्रस्तांच्या प्रमुख मागण्या

**१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाबाबत १८ एप्रिल २०२१ रोजी सिडको संचालक मंडळाने केलेला ठराव विखंडित करून लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा ठराव मंजूर करण्यात यावा.**

**२) जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना विनविलंब १२.५% भूखंड वाटप करण्यात यावेत.**

**३) २५ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या शासन आदेश (जीआर)बाबत प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेऊन योग्य ते बदल करण्यात यावेत.**

**४) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या सर्व प्रलंबित मागण्या बैठका घेऊन सोडविण्यात याव्यात.**

### पेण खारेपाटात अशुद्ध, गढूळ पाणीपुरवठा

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांचा तारांकित प्रश्न

**मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील खारेपाट भागात शहापाडा धरणातून अशुद्ध व गढूळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला आणि या प्रश्नावर राज्य शासनाचे लक्ष वेधले.

खारेपाट भागात कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही शहापाडा धरणातून अशुद्ध व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे जानेवारी २०२२मध्ये निदर्शनास आले आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या धरणावर बसविण्यात आलेले जलशुद्धीकरण संयंत्र कित्येक वर्ष बंद असल्यामुळे लाखो रुपये खर्च करूनसुद्धा विभागातील नागरिकांना शुद्ध व मुबलक पाणी मिळत नाही. या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय? चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शहापाडा धरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून येथील नागरिकांना शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनात दाखल केला होता. **(पान २ वर..)**




## पनवेलच्या जडणघडणीत महिलांचे योगदान महत्त्वाचे

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे गौरवोद्‌गार

**केदार भगत मित्र परिवाराकडून हळदीकुंकू आणि महिलांचा सन्मान**





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या जडणघडणीत महिलांचे योगदान महत्त्वाचे असून त्यांचा आदर्श घेऊन महिलांनी कार्यरत राहावे, असे आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे केले. केदार भगत मित्र परिवाराच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित हळदीकुंकू आणि २१ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान तसेच चला खेळूया पैठणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

या कार्यक्रमास महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, माजी नगरसेविका नीता माळी, सुहासिनी शिवणेकर, सुहासिनी केकाणे, नीता मंजुळे, लीना पाटील, दत्ता केंद्रे, नंदकुमार धोत्रे, आयोजक केदार भगत आदी उपस्थित होते.

जागतिक महिला दिनानिमित्त सर्वत्र महिलांसाठी विविध कार्यक्रम होत असतात. पनवेलमध्येही असाच कार्यक्रम भाजपचे युवा नेते केदार भगत यांच्या मित्र परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या वेळी हळदीकुंकूसोबतच गुरू कदम यांच्या चला जिंकूया पैठणी या खेळाचेही आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या. **(पान २ वर..)**

## नवाब मलिकांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे अल्पसंख्याकमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना विशेष पीएमएलए कोर्टाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यामुळे मलिकांचा मुक्काम २१ मार्चपर्यंत न्यायालयीन कोठडीत असणार आहे.

अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी केलेल्या आर्थिक व्यवहारप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मंत्री नवाब मलिक यांना २३ फेब्रुवारीला अटक केली होती. यानंतर न्यायालयाने मलिक यांना सात मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावलेली. त्यानंतर सोमवारी (दि. ७) झालेल्या सुनावणीदरम्यान मलिक यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

## महाडमध्ये ट्रकसह पाच लाखांचा खैरसाठा पकडला

**महाड** : महाड वन विभागाने गुजराकडून गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या एका विनापरवाना ट्रकवर मुंबई-गोवा महामार्गावर महाड तालुक्यातील राजेवाडी फाट्याजवळ रविवारी (दि. ६) रात्री कारवाई करून ट्रकसह पाच लाखांचा खैरसाठा जप्त केला. या प्रकरणी ट्रकचालक मालक शांताराम खंडू पाटील (रा. सिल्वासा, गुजरात) याला ताब्यात घेण्यात आले आहे. राजेवाडी फाट्याजवळ वनविभागाने सापळा रचून रात्री ११च्या सुमारास डीएन ०९-एन ९३४५ हा गुजरात सिल्वासा ते चिपळूण सावर्डेकडे जाणारा ट्रक अडवला. त्यात असलेली खैराची लाकडे सावर्डे येथे सचिन कात मिलकडे पोहचवायची होती. पथकाने ट्रकमध्ये असलेले खैराचे ३९५ नग व ट्रक असा मिळून पाच लाख किमतीचा माल ताब्यात घेतला. या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.




### निवडक

**पंतप्रधान मोदींची पुतिन, झेलेन्स्की यांच्याशी चर्चा**

**नवी दिल्ली** : रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोमवारी (दि. ७) युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लोदिमिर झेलेन्स्की यांच्यासोबत फोनवरून चर्चा केली. त्यानंतर काही वेळाने रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा केली. पंतप्रधान मोदींनी या वेळी सुरक्षित मार्ग तयार करण्यासाठी युद्धविरामासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल दोघांचे कौतुक केले. त्याचप्रमाणे युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीयांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सेफ कॉरिडोअर म्हणजेच सुरक्षित मार्ग निर्माण करण्यासाठी सहकार्य करण्याची मागणी केली.



# महिला दिन फक्त ८ मार्चलाच साजरा करायचा का? -चित्रा वाघ



**कर्जत : बातमीदार**

भाजपच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिन फक्त ८ मार्च रोजीच साजरा करायचा काय, असा प्रश्न उपस्थित करीत महिलांचा सन्मान राखायचा तर महिला दिन साजरा करायला तारीख कशाला हवी? असा प्रश्न आशा सेविका सन्मान सोहळ्यात केला.

कर्जत तालुका आणि नेरळ शहर भाजप महिला मोर्चा यांच्या वतीने सोमवारी (दि. ७) आशा सेविकांचा सन्मान करण्यात आला. नेरळ येथील जेटीएचएस स्कूल मैदानात आयोजित कार्यक्रमाला भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, नेरळच्या सरपंच उषा पारधी, पनवेल महापालिका नगरसेविका राजश्री वावेकर, महिला मोर्चा सोशल मीडिया समन्वयक गायत्री परांजपे, कर्जत तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे, नेरळ शहराध्यक्ष नम्रता कांदळगावकर, कर्जत नगरसेविका स्वामिनी मांजरे, विशाखा जिनगरे, तालुका उपाध्यक्ष वर्षा बोराडे, नेरळ ग्रामपंचायत सदस्या श्रद्धा कराळे, रेणुका चंचे, सुप्रिया भगत आदी उपस्थित होत्या. व्यासपीठासमोर भाजप तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, किसान मोर्चा प्रदेश सचिव सुनील गोगटे, भाजप तालुका सरचिटणीस संजय कराळे, नितीन कांदळगावकर, मिलिंद साने, पनवेलचे नगरसेवक समीर ठाकूर आदी उपस्थित होते. कोरोना काळात कामासाठी राज्य शासन दरडोई ३५ रुपये देणार होते. ते कधी देणार, असा सवाल वाघ यांनी उपस्थित केला.

पान १ वरून

## १७ मार्चला दास्तान फाट्यावर रास्ता रोको

सिडकोचा हा आडमुठेपणा म्हटला पाहिजे. म्हणूनच सिडकोच्या वर्धापन दिनाला कृती समितीच्या वतीने ९५ गावच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना वाचा फोडण्यासाठी जासई येथील दास्तान फाट्यावर रास्ता रोको करण्यात येणार आहेत. सकाळी १०.३० वाजता होणाऱ्या या रास्ता रोकोमध्ये ९५ गावचे सिडकोबाधित हजारो प्रकल्पग्रस्त शेतकरी काळा दिन पाळत सहभागी होणार आहे.

या आंदोलनाच्या आयोजनासंदर्भात झालेल्या बैठकीला समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस भूषण पाटील, जे. डी. तांडेल, सहसचिव संतोष केणे, दीपक पाटील, विनोद म्हात्रे, मनोहर पाटील, राजेश गायकर, विजय गायकर, अतुल पाटील, कमलाकर पवार, संजय घरत, हितेश गोवारी, सुनील पाटील, मोरेश्वर पाटील, नंदेश ठाकूर उपस्थित होते.

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांचा तारांकित प्रश्न

या प्रश्नावर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, खारेपाट भागात कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही शहापाडा धरणातून अशुद्ध व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याची बाब अंशतः खरी आहे. धरणातील पाणीसाठा संपल्यामुळे अशुद्ध व गढूळ पाणीपुरवठा झाला होता. त्यामुळे हा पाणीपुरवठा त्वरित बंद करण्यात आला, मात्र सद्यस्थितीत सिडकोकडून पाणी उपलब्ध करून शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

## पनवेलच्या जडणघडणीत महिलांचे योगदान महत्त्वाचे

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, महिला आणि पुरुष एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महिला या त्यागमूर्ती असल्याने त्यांचा नक्कीच मान-सन्मान झाला पाहिजे. त्यांचा सन्मान हा सर्व समाजासमोर होतो ही आनंदाची बाब आहे. महिलांचे कार्य उदात्त असते. महिलांचा सन्मान करून त्यांना प्रेरणा मिळावी हाच हा कार्यक्रमाचा उद्देश आहे. केदार भगत आणि मित्र परिवार नेहमीच समाजाप्रती कार्यरत असतात. त्यांनी आज या कार्यक्रमाचे आयोजन करून महिलांचा उचित सन्मान केला. त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे.

महिलांना नेहमी आकर्षित करणारी पैठणी या कार्यक्रमात विजेत्यांना बक्षिस म्हणून देण्यात आली. त्यामध्ये लकी ड्रॉ, तीन पैठणी साड्या, ५१ आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते, तर पारितोषिक वितरण वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, पूनम ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय या कार्यक्रमात २१ कर्तृत्ववान महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गीतांजली भगत, निकिता पाटील, सायली भगत, मंजिरी भगत, जिन्यासा भगत, प्रज्ञा भगत, योगिता डांगरे, प्रीती पाटील, प्रणाली बहिरा, अवंती गडगे, अंकिता बहिरा, सिमीन साळवी, अनिता गायकर, माधुरी अनिकेत सावंत, वैभवी वाघिलकर, पूनम पारचे, प्रचिती शेट्ये, श्रेया जाचक, ज्योत्स्ना दसवते, भक्ती शिंदे, अंजली अनभुले, प्रीती दसवते, भाविक शिंदे, संजीवनी वर्तले, अनिता ढगे, कांचन कदम, स्वप्नाली धनावडे, प्रतीक्षा दसवते, आरती घरत, अनिता मढवी, सुमित दसवते, संकेत दसवते, भावेश शिंदे, संतोष वर्तले, हर्षद गडगे, नितेश भगत, योगेश साळवी, अनिकेत सावंत, ब्रिजेश बहिरा, गौरव सावंत, साहिल मोरे, निखिल खैरे, श्रेयश शिंदे, रवी पारचे, सचिन जाचक, प्रथमेश धनावडे, जयदीप भगत, मंगेश भगत, मंदार भगत, सुबोध पाटील, चिन्मय भगत, निहाल म्हात्रे, सिद्धू मोरे, यज्ञेश पाटील, अथर्व पाटील, सचिन भगत, जयेश भगत, कुमार भगत, मच्छींद्र भगत, बाळकृष्ण भगत, नितीन पाटील, संतोष कथोरे यांनी प्रयत्न केले.

**सुनेने मानले पतीला किडनी दान केलेल्या सासूचे आभार**

नवीन पनवेलमधील शशिकांत लोखंडे यांची किडनी निकामी झाली असताना त्यांच्या आईने म्हणजेच बेबीताई चंद्रकांत लोखंडे यांनी त्यांना स्वत:ची किडनी दान केली. केदार भगत मित्र परिवाराने त्यांचा जाहीर सन्मान केला. त्यांची सून स्नेहा शशिकांत लोखंडे यांना कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले होते. या वेळी स्नेहा लोखंडे यांनी आपल्या सासूचे जाहीर आभार मानले. त्या म्हणाल्या की, सासूने मला माझे फक्त सौभाग्यच नाही, तर सर्वस्वच परत दिले. त्यामुळे त्यांचे आभार या व्यासपीठावरून जाहीरपणे मानत आहे. केदार भगत यांचे हे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याने त्यांचेही लोखंडे यांनी आभार व्यक्त केले.



## SRM E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ Tender-03/2021-22 Dtd. 08.03.2022 RFX No. 7000022459** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for the providing light Motor Vehicle Jeep Type ( i.e. Xylo, Mahindra Bolero/TUV, Sumo Gold etc) services along with fuel and driver at 220 kV Kandalgaon S/s under EHV (O&M) Division Mahad For the Year 2022-23. | **Rs. up to 5,37,229/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from **08.03.2022 @ 00:00 Hrs. to 14.03.2022 @ 23:59 Hrs.** for above tender
for further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**





## SRM E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ Tender-02/2021-22 Dtd. 08.03.2022 RFX No. 7000022461** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for the providing light Motor Vehicle Jeep Type ( i.e. Xylo, Mahindra Bolero/TUV, Sumo Gold etc) services along with fuel and driver at 220 kV Mahad S/s under EHV (O&M) Division Mahad For the Year 2022-23. | **Rs. up to 5,37,229/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from **08.03.2022 @ 00:00 Hrs. to 14.03.2022 @ 23:59 Hrs.** for above tender
for further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**



### पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com
कार्यालय जा. क्र. पमपा/कर/हस्तां./९३६/ /२०२२ दिनांक : ४/३/२०२२

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंदवहीतील नावात बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | फा.प्लॉट क्र. २६१, सदनिका क्र. अे-१०६, अभि दिप सोसा, पनवेल. | अरविंद पुखराम जैन | सुनिल परशुराम पंडित, रेखा सुनिल पंडित |
| २ | १६ | फा.प्लॉट क्र. २९०/१, गाळा क्र. ४३,नॅशनल पॅराडाईस सोसा, पनवेल. | मोहम्मद अस्जद ए. अजिज खान | संजिवनी भास्कर भिमटे, भास्कर रामचंद्र भिमटे |
| ३ | ४ | फा.प्लॉट क्र. २०५/७०, सदनिका क्र. अे-४, अंजली प्लाझा सोसा, पनवेल. | परशुराम लखमा कुंडल | लक्ष्मी गणेश थळकर |
| ४ | ११ | फा.प्लॉट क्र. ५८/१, सदनिका क्र.८, तेजस सोसा, पनवेल. | नंदकुमार रामभाई बुटाला | निकिता विजय शेठ |
| ५ | ७ | सिटी एस क्र. ११३२/३१ व ११३२/सी, सदनिका क्र. बी-१६, न्यु पारसमणी अपार्टमेंट सोसा, पनवेल. | श्रवनसिंग मोतीसिंग दहिया | कविता वीरेंद्रसिंह राठोड |
| ६ | १५ | फा.प्लॉट क्र. २४७, गाळा क्र.५६, शॉपिंग सेंटर इमारत क्र.३, पनवेल. | मधुकर बचाराम बनसोडे | अभिजीत बाळासाहेब आगलावे |
| ७ | ११ | सिटीएस क्र. ११७/२, सदनिका क्र. ०३, शिवसृष्टी सोसा, पनवेल. | बारकू रामदास फडके | निलिमा रूपेश पाटील |
| ८ | १ | प्लॉट क्र. ३४, सदनिका क्र. २१, कोणार्क प्लाझा, पनवेल. | सलिम अब्दुल करीम वाराकीया, कौसर सलिम वाराकीया | जावेद इस्माईल कोकाटे |
| ९ | १४ | सर्व्हे क्र. ४८४, सदनिका क्र. १०४, महाविर वाटीका, साईराज पॅराडाईस कॉम्प्लेक्स, पनवेल. | मे. सुपर कंन्स्ट्रक्शन | रंजिता सुधीर कुंभार, सुधीर पांडुरंग कुंभार |
| १० | ८ | फा.प्लॉट क्र. २२८, सदनिका क्र. १३, जे.के. पार्क सोसा, पनवेल. | भावना सुनिल भोईर | जयदास माया म्हात्रे |
| ११ | १० | सिटीएस क्र. १२६२ऐ व १२६२बी, शॉप क्र. ७,. मनिष मार्केट सोसा, पनवेल. | उज्वल राजीव दळवी उर्फ उज्वल दळवी | भरत सिंह हरलाल सिंह राजपुरोहित, अंकितर अमरसिंह राजपुरोहित |
| १२ | ११ | फा.प्लॉट क्र. ५८, सदनिका क्र. अे-२०१, जानवी सोसा, पनवेल. | नबिलाल जिलानी मुल्ला | दत्तात्रेय महादेव भांडवलकर |
| १३ | ११ | फा.प्लॉट क्र. ६४+६५/२ए, सदनिका क्र. ४, शेल्टन सोसा, पनवेल | विमल राधाकृष्ण पेडणेकर | सी विजया नायडु |
| १४ | ११ | फा.प्लॉट क्र. ६४+६५/२ए, सदनिका क्र. बी-५, शेल्टन सोसा, पनवेल | मनोज प्रितमलाल वोरा | महेश्वर चेल्वराज नायडू |
| १५ | १० | सिटी एस क्र. १२७५ व इतर, सदनिका क्र. बी-०८, मुनोथ नगर सोसा, पनवेल. | मनोज बबन देशमुख | अल्पेश कुमार एच पटेल |
| १६ | १४ | सर्व्हे क्र. ७४६, गाळा क्र. १४, आयडियल पॅलेस, पनवेल. | नंदकिशोर मथुराप्रसाद अमिर फतमा चौधरी, शबाना मुर्गे सायली श्रीकांत ठाकुर | चंद्रकांत काशिनाथ झंजे |
| १७ | १० | सिटी एस क्र. १२७३,१२७३/ए१, १२७३/२, सदनिका क्र. बी-००२, गोविंद आनंत, पनवेल. | प्रियल प्रॉपर्टीस तर्फे भागीदार जयेश भुपेंद्र गांधी | अरूण मधुकर मानकामे, माधुरी अरूण मानकामे, अक्षता निरंजन उपळेकर उर्फ अमृता अरूण मानकामे, अभिषेक अरूण मानकामे |
| १८ | ४ | फा.प्लॉट क्र. २०५/४, गाळा क्र. ०८, शाह आर्केड, पनवेल. | सुमित सिंग सन ऑफ अमिनचंद चौहान | मुजीत प्रकाश मपारा |
| १९ | ११ | फा.प्लॉट क्र. ११२, सदनिका क्र. ए-१, हर्ष निती सोसा, पनवेल. | सुनील केशव पाटील | भगवान जयवंत बिरमोळे |
| २० | ११ | फा.प्लॉट क्र. ११८, सदनिका क्र. ३०३, वास्तु सोसा, पनवेल. | सुरेश टोपणदास समतानी | भगवान जयवंत बिरमोळ, निलम अजित नलावडे |
| २१ | ११ | फा.प्लॉट क्र. ११८, सदनिका क्र. २०१, वास्तु सोसा, पनवेल. | बाळकृष्ण मंजुनाथ नायर बाळकृष्ण शंकर सालकर | भगवान जयंत बिरमोळे |
| २२ | ११ | फा.प्लॉट क्र. ११८, सदनिका क्र. २०४, वास्तु सोसा, पनवेल. | शैलेश गुजर | भगवान जयंत बिरमोळे |
| २३ | ११ | फा.प्लॉट क्र. ११८, सदनिका क्र. २०३, वास्तु सोसा, पनवेल. | सुषमा अशोक निंबाळकर जयवंत भगवान बिरमोळे | भगवान जयवंत बिरमोळे |
| २४ | ११ | फा.प्लॉट क्र. ११८, गाळा क्र.३, वास्तु सोसा, पनवेल. | विजया भारत अंगणे यांचे तर्फे कु.मु. भगवान जयवंत बिरमोळ | भगवान जयवंत बिरमोळे |
| २५ | १६ | फा.प्लॉट क्र. २९०/२ब,४५७, जेबी ४०२, कॉस्मोपॉलिटन सोसा, पनवेल. | फिरोज एन. रंगवाला | नसिमा अबिद रंगवाला |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
सहा. आयुक्त
पनवेल महानगरपालिका

### पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com
कार्यालय जा. क्र. पमपा/कर/हस्तां./२२२१/९३७/२०२२ दिनांक : ४/३/२०२२

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंदवहीतील नावात बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ८ | फा.प्लॉट क्र. २२५, सदनिका क्र. ०६, एकता सोसा, पनवेल. | अमृत मधुकर ठाकूर, दिपाली दिपक ठाकरे, राजेंद्र सोनाजी जाधव, अनघा राजेंद्र जाधव | बच्चु एस शाह |
| २ | ९ | फा. प्लॉट क्र. ४५८,४९७,४९८, सदनिका क्र. ३१, कल्पतरू रिव्हरसाईड, तक्का पनवेल | मे. कल्पतरू शरयन्स | लालू सी. थॉमस, वल्सा लालू सी |
| ३ | १६ | प्लॉट नं. ४४८,४४८अे,४४९/२, सदनिका क्र. ६०४, मोराज रिवरसाईड पार्क, तक्का पनवेल | रियाजुद्दीन एम. खोत | ऐइयाज रियाजुद्दीन खोत |
| ४ | Op९९ | सिटी एस क्र. १३६७/A१, सदनिका क्र. बी-००३, उषाप्रभा सोसा, पनवेल | श्री समर्थ कृपा सोसा, मान्यता देणारे उषा प्रभा सोसा | मेघा मोहन पाटील |
| ५ | Op९९ | सिटी एस क्र. १३६७/A१, सदनिका क्र. बी-४०४, उषाप्रभा सोसा, पनवेल | श्री समर्थ कृपा सोसा, मान्यता देणारे उषा प्रभा सोसा | विलास नारायण म्हात्रे |
| ६ | ७ | सिटी एस क्र. २१३/३-ए, २१३/३-बी, सदनिका क्र. बी-७, इरफान पॅलेस, पनवेल. | गुलनार बशीर अहमइ नाजीरी तर्फे अख इनाम मोहम्मद देशमुख | शकील अहमद अब्दुर रजाक |
| ७ | Op९९ | सिटी एस क्र. १३६७/A१, सदनिका क्र. ए-२०१, उषाप्रभा सोसा, पनवेल | श्री समर्थ कृपा सोसा, मान्यता देणारे उषा प्रभा सोसा | दिलीप कमळाकर दळवी |
| ८ | Op९९ | फा. प्लॉट क्र. ३३, सदनिका क्र. ४०३, साई रेडीयंन्स, पनवेल | मे. प्रसाद इस्टेट | अरूणा उदय लोटलीकर, गौतम उदय लोटलीकर |
| ९ | १ | सिटी एस क्र. ४५७, सदनिका क्र. १०२, सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स पनवेल. | भानजी गांगजी गाला, किरीट भानजी गाला | हरीश भानजी गाला |
| १० | १२ | प्लॉट क्र. १२५ A, सदनिका क्र. जी-३०४, नंदनवन कॉम्प्लेक्स सोसा, पनवेल. | चंद्रशेखर विठ्ठल माजगावकर, मनाली चंद्रशेखर माजगावकर | शंकर रामण्णा पोस्तार, छाया शंकर पोस्तार |
| ११ | ९ | फा. प्लॉट क्र. ४९४, सदनिका क्र. बी-६०३, वसंत आलाप सोसा, पनवेल | विजय नामदेवद माळी | अक्षय आनंद जोरी, अजय आनंद जोरी, आनंद महादू जोरी, अनिता आनंद जोरी |
| १२ | १४ | सीटी एस क्र. ४७८, प्लॉट क्र. ३८, आदर्श सोसा, पनवेल | भूवनेश चंद्रा | विवेक चंद्रा |
| १३ | ५ | सिटी सर्व्हे क्र. ४४९ए, ४४९बी, ४५०/१, ४५०/२, सदनिका क्र. सी-१०३, श्री गणेश दर्शन, पनवेल. | राजेंद्र सुभाष पोवळे | स्वप्नील गणेश सहस्त्रबुध्दे |
| १४ | ५ | सिटी एस क्र. ५३३ए, सदनिका क्र. ए-६, अबधुत सोसा, पनवेल. | सदाशिव नारायण रिसबुड | जगदिश विठ्ठल जोशी |
| १५ | १२ | फा. प्लॉट क्र. १२९, सदनिका क्र. ए-२०७, यशोपुरम वसंत, पनवेल. | संध्या एस कुपेकर | सुहास तुकाराम कुपेकर |
| १६ | ९ | फा. प्लॉट क्र. ४५८,४९७, सदनिका क्र. सी.९२, कल्पतरू रिव्हरसाईड, तक्का, पनवेल. | मे. कल्पतरू शरयन्स हर्षवर्धन क्रिष्णकुमार मुरारका तर्फे कु.मु. संजय रामचंद्र जगे | संजय रामचंद्र जगे, विद्या संजय जगे |
| १७ | ५ | सिटी एस क्र. ४४९ए+४४९बी+४५०/१ ते २/१, सदनिका क्र. बी-४०१, श्री गणेश दर्शन सोसा, पनवेल. | लक्ष्मण मारुती सकटे | संतोष दगडु ओंबळे, ललिता संतोष ओंबळे |
| १८ | ९ | फा. प्लॉट क्र. ४५८,४९७,४९८, सदनिका क्र. ७२, कल्पतरू रिव्हरसाईड, तक्का, पनवेल. | मे. कल्पतरू शरयन्स | प्रितीष, श्वेता दास |
| १९ | ९ | फा. प्लॉट क्र. ४५८,४९७,४९८, सदनिका क्र. डी-२३, कल्पतरू रिव्हरसाईड, तक्का, पनवेल. | मे. कल्पतरू शरयन्स स्वाती आरोरा, राकेश आरोरा | जी. शर्मिला वाईफ ऑफ एलेंचेझियन |
| २० | ११ | प्लॉट क्र. ८८, सदनिका क्र. ३०२, वसंत पुष्प सोसा, पनवेल. | अनंत शांताराम फडके, अंकिता अनंत फडके | प्रशांत सुधाकर मनोरे, प्रियदर्शनी प्रशांत मनोरे |
| २१ | ११ | फा. प्लॉट क्र. ११८/१, गाळा क्र. ४, वास्तु सोसा, पनवेल. | मिताली रामकृष्ण इंदलकर, शिल्पा महेश देशमुख, अभिजित महेश देशमुख | भगवान जयवंत बिरमोळे |
| २२ | ११ | फा. प्लॉट क्र. ९४, सदनिका क्र. सी-२०४, नील पार्क सोसा, पनवेल. | चिदघन सुकृत खांडेकर, | उन्नती चंद्रशेखर वाडकर |
| २३ | ७ | सिटी एस क्र. २१३/३अ व २१३/३बी, सदनिका क्र. बी-१५, इरफान पॅलेस, पनवेल. | मुस्ताक अहमद अनुनकर अन्सारी | मोहम्मद अदिल मुस्ताक अन्सारी |
| २४ | १० | सिटी एस क्र. १२७१/१ ते १२७१/१०, १२७१/ए,बी, १३३८, सदनिका क्र. सी-२०१, रचना हाईट्स सोसा, पनवेल. | सरलाबेन लिलाधर शाह तर्फे कु.मु. महेंद्रसिंह उदयसिंह सोढा | दीपाश्री मनिष पारंगे, मनिष मधुकर पारंगे |
| २५ | ४ | प्लॉट क्र. १९८/ए/२०५/१४, सदनिका क्र. ३०१, श्री प्रभाकर राजे कॉम्प्लेक्स सोसा, पनवेल. | तुरब अब्दे अली सावलीवाला | सनिल संतोष नागे, |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
सहा. आयुक्त
पनवेल महानगरपालिका



## CHANGE IN NAME

My Old Name was **Hemlata Dattatraya Vedak.** As per Maharashtra Govt. Gazettee December 27, 1984 (V-80) I will be Known as **Mrs. Bhavana Bharat Mathkar** (Residing at : Durga Krupa Society, 1st Floor, B-Wing, Room No. 10, Savarkar Chowk, PANVEL-410 206, Dist. Raigad, State-Maharashtra).

**Mrs. Bhavana Bharat Mathkar**
(Sd/- New Name)

## नावात बदल

माझे जुने नाव **हेमलता दत्तात्रय वेदक** असे होते . महाराष्ट्र शासन राजपत्र, डिसेंबर २७, १९८४ (V-80) नुसार यापुढे मी **सौ. भावना भरत मठकर** (राहणार - दुर्गाकृपा सोसायटी, पहिला मजला, बी-विंग, रुम नं. १०, सावरकर चौक, पनवेल-४१०२०६, जि. रायगड, महाराष्ट्र) या नावाने ओळखली जाईल.

**नवीन नावाने सही./- सौ. भावना भरत मठकर**

# पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील



भाजीवाली ते उपमहापौर हा प्रवास लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या आशीर्वाद, लोकांच्या प्रेमामुळे आणि आमदार प्रशांतदादा व सभागृह नेते परेशशेठ यांच्यामुळेच शक्य झाल्याचे पनवेलच्या महापौर सीताताई सदानंद पाटील यांनी महिला दिनानिमित्त सांगितले.

मोठा खांदामध्येच जन्म झालेल्या सीताताईंना समाजकार्याची पहिल्यापासून आवड होती. लग्नानंतर खांदा कॉलनीत भाजी आणि दुधाचा व्यवसाय करीत होत्या. त्याठिकाणी येणाऱ्या अनेक महिला गप्पा मारताना त्यांच्या समस्या सांगत अनेक महिलांच्या छोट्या मोठ्या समस्या त्या सोडवित असल्याने महिला आपल्या समस्या घेऊन त्यांच्याकडे येत असत. त्यामध्ये नवरा बायकोच्या भांडणापासून सर्व प्रकारच्या घरगुती समस्या असत. त्यांच्या समस्या सोडवून नवरा बायकोचा संसार पुन्हा सुरू करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. माझ्याकडे आलेल्या कोणत्याही महिलेला न्याय मिळाल्याशिवाय राहत नसे. माझ्याकडे येणाऱ्या महिलांचा एक ग्रुप तयार झाला. त्यातूनच महिलांचे मंडळ स्थापन करण्याचा विचार आला. त्यावेळी ३०० महिला घेऊन स्थापन झालेले मंडळात आज सुमारे चार हजार महिला आहेत. त्या मंडळातर्फे आम्ही हळदी-कुंकू, गणेशोत्सव या सारखे कार्यक्रम राबवित होतो. त्याचा एक लहानसा बॅनर लावलेला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्यकर्त्यांनी पाहिला त्यांनी शेठना माझी माहिती दिल्यावर एकदा फोनवर माझ्याशी त्यांचे बोलणे झाले. मग त्यांच्या भगिनी रत्नाताई घरत आणि त्यांच्या सहकारी माझ्या घरी आल्या. त्यांनी ताई तुमचे काम खूप चांगले आहे. त्यामुळे आमच्या पक्षात घेण्याचे आम्ही काम करणार आहोत. मला राजकारण माहीत नसल्याने मी त्यांना विचारले मला काय करावे लागेल? त्यांनी सांगितले तुम्ही जे आता करताच तसेच कार्य आपल्या पक्षात करायचे मग मी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. मला खांदा विभागाचे अध्यक्ष करण्यात आले.

मला त्यानंतर पनवेल नगरपालिकेसाठी तिकीट दिले. मी दोनवेळा नगरपालिकेवर निवडून आले. महापालिका झाल्यावर मला पुन्हा तिकिट मिळाले मी निवडून आले. भाजपने मला ओबीसी महिला संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्षपदही दिले आहे. मल्हार मोहोत्सव पाहून मला खांदा कॉलनीत कोकण महोत्सव करण्याची कल्पना सुचली. ओम साई महिला मंडळातर्फे आम्ही तो भरवतो यंदा त्यांचे ११वे वर्षे आहे. त्यामध्ये विविध प्रकारच्या वस्तूंचे स्टॉल असतात. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक कलाकारांना संधी उपलब्ध करून देतो. या महोत्सवाला चांगला प्रतिसाद मिळतो हजारो लोक त्याला भेट देतात.

कोरोना काळात रुग्णाला कोणी भेटायला जात नसत. त्यावेळी मी त्यांना भेटायला जात असे माझ्या घरून त्यावेळी विरोध होत असायचा, पण पतीची साथ असल्याने मी अनेकांना बेड मिळवून दिला. रेमिडिसीवर, लस उपलब्ध करून देण्यास मदत केली. एका महिलेच्या पतीचा जीव वाचवल्याबद्दल तिने माझे आभार मानले. आज कोठेही भेटले तरी वयाने मोठे असूनही मला नमस्कार करतात, मला ते आवडत नाही. माझ्या स्वप्नात ही नसताना लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांतदादा यांनी माझे काम पाहून मला उपमहापौर केले. मी मनात आणले असते तरी माझ्यासारख्या भाजीवालीला ते शक्य नव्हते. त्यामुळेच मी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांतदादा ठाकूर, परेशशेठ ठाकूर आणि मला भाजीवाली म्हणून निवडून देणाऱ्या मतदारांचे आभार मानते

**शब्दांकन : नितीन देशमुख, पनवेल**

# डॉ. प्ररिया ईशपुनियानी

महिला दिनाच्या निमित्ताने मी दरवर्षी आजूबाजूला पाहते. उत्सव, गुलाबी कपडे बघते, स्त्री च्या रोजच्याच कामाचे अचानक होणारे वारेमाप कौतुक ऐकते आणि पुरूष सहकाऱ्यांकडून भरपूर उपहासही पाहते. जणू काही स्त्रियांना हे हवे आहे. पण तसं नाही, सर्व महिलांना समानता हवी आहे, चांगले काम करण्याची समान संधी हवी आहे. त्यांची योग्यता दाखवण्यासाठी, त्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी. विशेष सवलती नको आहेत, हवा आहे, तो त्यांना गौण न मानता दिला जाणारा समान अधिकार.



मला एक किंवा दोन वर्षे लागली खरी, परंतु मी डीएनबी जनरल सर्जरीद्वारे शल्यविशारद शाखा मिळवली. मला अशा विभागात प्रशिक्षिण घेण्याचे भाग्य लाभले, जेथे तुमचे लिंग कोणते हे महत्त्वाचे नव्हते. तिथे माझे मनोबल आणि कौशल्याचा भक्कम पाया घातला गेला.

शस्त्रक्रिया पदवी प्राप्तीनंतर मी विविध नामांकित रुग्णालयांमध्ये निवासी डॉक्टर म्हणून काही वर्षे उत्तम कामगिरी केली. त्या अनुभवांनी माझ्या आत्मविश्वासाला अधिक मजबूत केले. एक गोष्ट कळून चुकली ती म्हणजे हे एक दीर्घयुद्ध आहे. बहुत दूर जाना है. प्रत्येक विरोधागणिक मी अधिक दृढ होत गेले.

मला माझ्या पीजीच्या दिवसांपासून पचनसंस्थेच्या शस्त्रक्रियेत रस होता आणि ते सुपरस्पेशालिटी म्हणून घेण्याचा माझा मानस होता. या शोधात मी सर्जिकल ऑन्कोलॉजीच्या फेलोशिपमध्ये सामील झाले. दुसऱ्या वर्षी जेव्हा मला पर्याय निवडावा लागला, तेव्हा माझ्या इतर पुरुष सहकाऱ्यांप्रमाणे मी गॅस्ट्रोइंटेस्टाइनल (जीआय) शस्त्रक्रियेसाठी एक वर्ष मागितले. वरिष्ठ शल्यचिकित्सकांसह अनेकांनी मला त्याविरुद्ध सल्ला दिला. मला ब्रेस्ट सर्जरी घेण्याचा सल्ला देण्यात आला. कारण कुशल असूनही, या क्षेत्रात येण्यास समाज महिलांसाठी अद्याप तयार नाही. पुन्हा एकदा ही पुरुषांची शाखा आहे हे मला ऐकवले गेले. मात्र लोक काय म्हणतील, याची पर्वा न करता मी उत्कटतेने माझ्या मनाची लढाई जिंकली.

बऱ्याच स्त्रियांसाठी कर्करोग सर्जन एकतर स्तन किंवा स्त्रीरोग ऑन्को सर्जन असतात. इतर क्षेत्रात मात्र समान मान्यता मिळविण्यासाठी महिलांना किमान दसपट अधिक प्रयत्न करावे लागतात आणि कधी कधी तर तेही पुरेसे पडत नाहीत. रुग्णालये महिला शल्यचिकित्सकांच्या उन्नतीसाठी गुंतवणूक करू इच्छित नाहीत. त्यांचे लग्न होईल आणि त्यांचे काम बंद होईल या भीती पोटी असेल कदाचित. आज मी एक विख्यात झाले की, नाही यावर दुमत असू शकते. पण त्याहीपेक्षा मी कुशल यशस्वी स्त्री शल्यविशारद आहे, याचा मला विशेष अभिमान आहे.

**शब्दांकन : डॉ. सुरेश सोनमाळे**

# सुमनताई तोगरे



उरण तालुक्यातील केगावच्या सुमनताई संग्राम तोगरे. ६२ वर्षीय अंधारातील पणतीप्रमाणे सदा प्रकाश पसरवित आहेत. लौकिकार्थाने त्या अशिक्षित, परंतु सुशिक्षितांना लाजवेल अशी हुशार कुशाग्र बुध्दीच्या चतूर स्मरणशक्ती इतकी अगाध की ३०-३५ वर्षांपुर्वीचा एखाद्या प्रसंग विचारता त्या दिवस, वार, तारीख सहित घटणाक्रम लिलया सांगतील.

घराचे संपूर्ण अर्थखाते त्यांच्याच हाती पण चुकूनही खोट नाही की गोंधळ नाही. अनपढ असूनही चार मुलांचे संगोपन करताना उच्चशिक्षित करताना शिलाई काम, दुध विक्री व एन.ए.डी. मध्ये दारोदार फिरून रेडिमेड कपडे विक्री करून सुमनताई तोगरे यांनी आपला संसार सांभाळला.

अन्येक अडचणींचा सामना करताना महिला वर्गाची कुचंबना होताना पाहून द्रवित मनाने त्यांनी महिलांसाठी काही तरी वेगळे केले पाहिजे, त्यांना स्वावलंबी बनविले पाहिजे या उदात्त हेतूने महाराष्ट्र शासनाच्या महिला बचत गट योजनेची माहिती घेऊन २००९ मध्ये दीन दुबळ्या झोपडपट्टीतील १६ महिलांना घेऊन मुक्ताई महिला उत्कर्ष मंडळाची स्थापना करून सर्वानुमते अध्यक्ष व संचालिका म्हणून आज तागायत निःस्वार्थपणाने कार्यरत आहेत. गटाचे संकलन व पंचायत समितीच्या अर्थ साह्यातून महिलांचा उत्कर्ष होताना पाहून दुसऱ्या गटांसाठी नाईकनगर येथील महिलांनी विनंती केल्याने मुक्ता साळवे महिला समुह या नावाने वेगळा गट सुमनताई यांनी स्थापन केला. निर्विवाद संचालन पाहून तिसऱ्या गटासाठी डाऊरनगरच्या काही स्त्रीयांची मागणी आली. शेवटी सुमनताई तोगरे यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन रितसर बचत गटाची स्थापना झाली व या दोन्ही समुहाचे वेगळे कार्यकारी मंडळ नेमून कार्यभार सोपविला. सुमनताई तोगरे यांच्या या अलौकिक कार्याची ओळख व्हावी व हा वसा कुणीतरी घ्यावा हीच मनिषा.

**शब्दांकन : विठ्ठल ममताबादे, उरण**




# बेबीबाई गावंड



उरण तालुक्यातील पिरकोन गावातील बेबीबाई मधुकर गावंड यांनी त्यांच्या नवऱ्याच्या मुत्यूनंतर श्री गणेश महिला मंडळ पिरकोनमध्ये सहभाग घेऊन गावात हळदीकुंकू समारंभात मोलाची भूमिका बजावली आहे. पतीच्या मृत्युनंतरसुद्धा अशा कार्यक्रमात मोठ्या धिराने मनापासून काम केले आहे. गावातील धवलारीनच्या सत्कार समारंभात आपले योगदान दिले आहे.

पतीच्या निधनानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी बेबीताई गावंड यांच्यावर पडली. त्यांनी न डगमता दोन्ही मुलामुलींचे पंधरावीपर्यंत शिक्षण पुर्ण केले. मुलाला स्वत:च्या पायावर खंबीरपणाने उभे केले. समाजातून त्रास होत असताना सुद्धा या रणरागीणीने आपले समाजसेवेचे काम अखंडपणे चालू ठेवले आहे. अशा लढवय्या रणरागिणीचे महिला दिनानिमित मनापासून धन्यवाद.

**शब्दांकन : दिनेश पवार, उरण**

# जागृती ठाकूर



वयाच्या सातव्या वर्षापासून आपल्या नृत्याची सुरुवात करून जागृती ठाकूर यांनी अनेक तालुका व जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत यश संपादित केले आहे. पुढे जाऊन श्री रत्नेश्वरी कलामंच जसखारचे सर्वेसर्वा महाराष्ट्र राज्य पुरस्कार २०२२ प्राप्त श्री सचिन लहू ठाकूर यांच्यासोबत विवाह बंधनात अडकल्यानंतर त्यांच्या नुत्य कलेला खरी कलाटणी मिळाली. घर आणि मुलाला सांभाळून रत्नेश्वरी कलामंचची जिम्मेदारी हाती घेऊन महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्या बाहेर जाऊन अनेक स्पर्धा व ऑर्केस्ट्राच्या माध्यमातून आपली नृत्य कला त्या सादर करत आलेल्या आहे.

तसेच झी टीव्हीवरील डान्स इंडिया डान्स सूपर मॉम्स या इंटरनॅशनल डान्स रिॲलिटी शोमध्ये थेटर राउंड (टॉप १६) पर्यंत मजल मारली आहे. तसेच दूरदर्शन, इ टीव्ही मराठी, इ टीव्ही कन्नड, इ टीव्ही तेलगु, इ टीव्ही बंगाली इत्यादी टीव्ही क्षेत्रात जागृती ठाकूर यांनी आपली नृत्याची अदा सादर केली आहे.

युटूबच्या माध्यमातून साई तुझ्या भेटीसाठी, दिला निरोप एकवीरा माऊलीला, आम्ही मुंबईचे राजे, पुनवचा चांद, एकवीरा माय माऊली, रत्नेश्वरी माऊली नवसाला पावली अशा अनेक गाण्यांच्या माध्यमातून प्रत्येक घराघरात पोहचली आहे. गेली २५ वर्षे नृत्य कलेशी प्रामाणिक राहून आतापर्यंत जागृती ठाकूर यांनी ७००च्यावर मुलामुलींना नृत्याचे धडे दिले आहेत व देत आहे.

**शब्दांकन : विठ्ठल ममताबादे, उरण**

# स्नेहा कांदू



अलिबागच्या स्नेहा गणेश कादू यांच्या पतीचे एका अपघातात निधन झाले. पतीच्या अकाली निधनामुळे सर्व संपले असे वाटत होते. घरात सासू व्यतिरिक्त दुसरी मोठी व्यक्ती नव्हती. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. घरात कुणीच करते-सवरते नव्हत. १५ फेब्रुवारीला पतीचे निधन झाले आणि कोरोनामुळे २२ मार्चला कडक लॉकडाऊन झाले. तेव्हा परिस्थिती खुपच नाजूक होती. काय करावे, हे कळत नव्हते. दोन मुली पदरात तिसरे बाळ पोटात अशावेळी संसाराचा गाडा चालवायचा कसा, असा प्रश्न होता, परंतु स्नेहा कांदू डगमगून न जाता धीरानं उभ्या राहिल्या. एक आशेचा किरण होता, पतीने सुरू केलेला साऊंड सिस्टीमचा व्यवसाय. हा व्यवसाय बंद पडू द्यायचा नाही या जिद्दीने स्नेहा यांनी हा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. पतीने जोडलेली माणसे मदतीला घेतली. घरतल्या मंडळींनी साथ दिली.

साऊंड सिस्टीमची काहीच माहिती नसताना पतीने सुरू केलेला हा व्यवसाय पुढे सुरू ठेवण्याचा निर्णय स्नेहा कांदू यांनी घेतला. आता त्या सर्व व्यवसाय स्वतः सांभाळतात. त्यांच्यामुळे काही जणांना रोज-गार उपलब्ध झाला आहे. कोणताही प्रसंग आल्यास डगमगून न जाता परिस्थितीशी झुंजण्याची जिद्द असल्यास त्यावर मात करता येते, हे स्नेहा कांदू यांनी दाखवून दिले आहे.

**शब्दांकन : प्रकाश सोनावडेकर, अलिबाग**

# महिला स्वच्छतादूत आणि आशा सेविकांचा विशेष सन्मान

**पनवेल : प्रतिनिधी**

महिला दिनाच्या पूर्वसंध्येला महापालिकेच्या वतीने आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महिला स्वच्छतादूत आणि आशा सेविकांना साडी व मानचिन्ह देऊन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या वित्तीय सल्लागार दिपा राऊत यांचे हस्ते विशेष सन्मानित करण्यात आले.



या वेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या वित्तीय सल्लागार दिपा राऊत, महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, महिला बालकल्याण समितीच्या सभापती हर्षदा उपाध्याय, नगरसेविका, प्रभाग समिती सभापती, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, पालिका अधिकारी उपस्थित होते.

या वेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या वित्तीय सल्लागार दिपा राऊत यांनी महिलांना आर्थिक बचतीचे नियोजन करून आर्थिकदृष्ट्या महिलांनी सक्षम होणे गरजेचे असल्याचे सांगितले, तसेच हे नियोजन करताना घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले.

महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी महिला स्वच्छता दूत व आशा सेविका यांनी दोन वर्षे कोविड काळात केलेले काम कौतुकास्पद असल्याचे सांगून त्यांच्या कामास मानाचा मुजरा करत असल्याचे सांगितले. आयुक्त गणेश देशमुख यांनी कोविड काळात महिला स्वच्छतादूत आणि आशा सेविकांनी केलेले काम महापालिकेदृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक म्हणून महिला दिनाच्या पूर्वसंध्येला हा खास सन्मान करण्यात आला असल्याचे सांगितले.

कोविड काळात महिला स्वच्छतादूत आणि आशा सेविका या कोविड योध्दांनी केलेल्या कामाचे कौतुक व्हावे या आयुक्त देशमुख यांच्या संकल्पनेला महिला बालकल्याण विभागाने प्रत्यक्ष रूप दिले. या कार्यक्रमाचे आभार महिला बालकल्याण समितीच्या सभापती हर्षदा उपाध्याय यांनी मानले.

# सभापती वृषाली वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम पनवेलमध्ये राबवण्यात येत आहेत. त्यानुसार दिव्यांगांना मोफत साहित्य वाटप आणि हायमास्ट दिव्यांच्या लोकार्पण सोहळ्याचे सोमवारी (दि. ७) आयोजन करण्यात आले होते. पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर या वेळी उपस्थित होते.







सभापती ॲड. वृषाली वाघमारे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा झाला. त्यानुसार पनवेल एस.टी.स्टँडच्या मागे असलेल्या इच्छापुर्ती गणेश मंदिराध्ये दिव्यांगांना मोफत साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच ॲड. वृषाली वाघमारे यांच्या नगरसेवक निधीमधून उभारण्यात आलेल्या हायमास्टचे भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

या कार्यक्रमावेळी नगरसेवक तथा महाराष्ट्र कुष्ठपिडीत संघटनेचे सल्लागार ॲड. मनोज भुजबळ यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, चंद्रकांत मंजुळे, जितेंद्र वाघमारे, मयुरी उनटकट, नंदा टापरे, ज्योती गुपत, जरीना शेख, अस्मा शेख, महेश पाटील, मंदिराचे ट्रस्टी अशोक कांबळे, आयोजक महाराष्ट्र कुष्ठपिडीत संघटनेचे सचिव अशोक आंबेकर, दिव्यांग समन्वयक सचिव संजय जाधव, दिपक घाग, दिव्यांग सेलचे शिवाजी कांबळे, जीवण प्रेरणा संस्थेचे अध्यक्ष के. बी. सवडे, दिव्यांग महिला आघाडीच्या रेश्मा कांबळे आदी उपस्थित होते.

## शॉप विकणे आहे

पनवेल महानगरपालिका हद्दीत ६१५ बिल्टअप एरिया असलेले शॉप विक्री करणे आहे.

-: संपर्क :-
9321592113
8104477440

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-03/22-23 / Rfx No.7000022448 | Hiring of Vehicle i.e. swift desire or similar with AC For Executive Engineer under 400 KV R.S Nagothane Division for financial year 2022-23 | **Rs. 5,78,825/-** | **14.03.22 up to 23:59 hrs** |
| 2 | e-Tender-04/22-23 / Rfx No.7000022444 | Hiring of LMV (e.g. Xylo, TATA SUMO or Similar) towards 400 KV Line Main. Sub-Division, Nagothane for the period for financial year 2022-23 | **Rs. 5,78,825/-** | **14.03.22 up to 23:59 hrs** |
| 3 | e-Tender-05/22-23 / Rfx No.7000022445 | Hiring of LMV (e.g. Xylo, or Similar) towards 400 KV Maintenance & 400 KV Testing Unit at 400 KV R.S. Nagothane Division for financial year 2022-23 | **Rs. 5,78,825/-** | **14.03.22 up to 23:59 hrs** |
| 4 | e-Tender-06/22-23 / Rfx No.7000022446 | Hiring of MMV (e.g. TATA 407, Mahindra pickup) towards 400 KV Line Main. Sub-Division, Nagothane at 400 KV R.S. Nagothane Division for the financial year 2022-23 | **Rs. 5,80,592/-** | **14.03.22 up to 23:59 hrs** |
| 5 | e-Tender-01/22-23 / Rfx No.7000022330 | Work of cleaning & sweeping of office premises at 400kV Nagothane, 220kV IPCL, 220kV SPCL S/S and MSETCL colony along with operating water supply system to all buildings Every day under 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane | **Rs. 2,97,013/-** | **14.03.22 up to 23:59 hrs** |

EMD fee 1% of estimate amount for Sr. No. 1 to 4 and Rs. 5000/- for serial no 5 & Tender fee Rs. 500/- + GST. For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/**

**Contact Person:** MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID : **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

## संपादकीय

# मोदी सरकारची प्रकल्पपूर्ती

सलग दुसऱ्यांदा बहुमताने केंद्रात सत्तेवर आलेले मोदी सरकार मिळालेल्या संधीचे सोने करीत आहे. ज्या जनतेने आपल्याला भरभरून कौल दिला त्या सर्व घटकांना आवश्यक सोयीसुविधा पुरवून त्यांचे जीवन सुकर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांचे सहकारी करीत आहेत. पुण्यातील विविध प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन त्याचाच एक भाग आहे.

**महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे नगरीसाठी रविवारचा दिवस ऐतिहासिक आणि सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखाच म्हटला पाहिजे. या एकाच दिवसात पुणेकरांना खूप काही मिळाले. यात सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पुण्यात मेट्रो रेल्वे धावली असून या प्रकल्पातील गरवारे महाविद्यालय ते वनाज आणि पिंपरी-चिंचवड ते फुगेवाडी या दोन मार्गांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. विशेष म्हणजे पुण्यातील मेट्रो प्रकल्पाचे भूमिपूजन पंतप्रधान मोदींच्याच हस्ते झाले होते. अशा प्रकारे पंतप्रधान आणि त्यांच्या सरकारने प्रकल्पपूर्ती केली आहे. पंतप्रधानांनी स्वत: तिकिट काढून मेट्रोमधून प्रवासही केला. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना वाहतुकीचा एक उत्तम पर्याय उपलब्ध झाला आहे. आपल्या देशात वेगाने शहरीकरण होत आहे. २०३०पर्यंत शहरी लोकसंख्या ६० कोटींपेक्षा अधिक होईल. शहराची वाढती लोकसंख्या संधी निर्माण करण्यासोबत आव्हानेही निर्माण करते. शहराच्या विस्तारासोबत रस्ते वाहतूकीला मर्यादा येतात. अशा वेळी सार्वजनिक वाहतूक सुविधेचा विकास हाच सर्वोत्तम पर्याय आहे. त्यामुळे केंद्र सरकार अशा वाहतूक सुविधांवर आणि विशेषत: मेट्रो प्रकल्पावर विशेष लक्ष देत आहे, असे या वेळी पंतप्रधान मोदींनी नमूद केले. आज देशांतील दोन डझनपेक्षा अधिक शहरात मेट्रो प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर आदी ठिकाणी मेट्रो रेल्वेचा विस्तार होत आहे, असेही त्यांनी सांगितले. मेट्रोसेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासोबतच पुणे महापालिकेच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्याचे अनावरण, मुळा-मुठा नदी सुधार आणि मुळा-मुठा नदीकाठ पुनरुज्जीवन प्रकल्पाचे भूमिपूजन तसेच विजेवर धावणाऱ्या (ई-बस) १४० गाड्यांचे आणि ई-बस आगाराचे लोकार्पण, व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण आर्ट गॅलरीचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झाले. यामुळे आगामी काळात पुण्याचे रूपडेच पालटणार आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार केंद्रात सत्तेवर आल्यापासून विविध प्रकल्प आकारास येत आहेत. पूर्वी प्रकल्पाचे उद्घाटन होत असे, मात्र तो प्रकल्प पूर्ण होईल की नाही याची शाश्वती नसे. गंभीर म्हणजे अनेक वेळा गैरव्यवहार होऊन तो प्रकल्प एकतर गुंडाळला जाई किंवा तसाच पडून राहत असे. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर हे चित्र बदलले. प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत यासाठी पीएम गती-शक्ती राष्ट्रीय बृहत् आराखडा केंद्र सरकारने तयार केला आहे. विकासाचा बॅकलॉग भरून काढत नागरिकांना विविध सोयीसुविधा देण्याचा चंग मोदी सरकारने बांधला आहे. यामध्ये विरोधकांनी कितीही अडथळे आणले तरी हे सरकार थांबणार नाही. विकासाचे चक्र देशात अविरतपणे सुरूच राहणार असून त्यातून देश आणि देशवासीयांच्या प्रगती व विकासात भर पडणार हे नक्की!**

# स्त्री सक्षमीकरण काळाची गरज



स्त्रीमुक्ती, स्त्रीवाद, फेमिनिझम हे शब्द आपण सगळ्यांनी ऐकलेले आहेत, पण दैनंदिन आयुष्यात या विषयाचा कुणी सहसा वेगळा असा विचार करत नाही. या व्याख्यांचे विविध पैलू आहेत आणि ते आपल्या जगण्या वागण्यात मिसळून गेलेत या अनुषंगाने पाहायला गेलं तर असे लक्षात येईल की लहानपणापासून मनावर बिंबवल्या गेलेल्या किंवा सभोवतालच्या वातावरणातून आपण घेतलेल्या शिकवणीनुसारच आपलं म्हणजे स्त्री आणि पुरुषाचं आचरण आहे. आपल्यापैकी प्रत्येकालाच स्वतः च्या स्त्री-पुरुष समानतेच्या अनुभवाशी प्रामाणिक राहून महिला सक्षमीकरण या मुद्द्याकडे पाहता येईल.


महिला सक्षमीकरण हा विषय मल्टी डायमेन्शनल आहे विविध दृष्टिकोनातून तो अभ्यासायला हवा. केवळ पुरुषांच्या तुलनेत स्त्री किती दुर्बल आहे हे तपासून चालणार नाही. हा विषय केवळ स्त्रीमुक्ती चळवळीचा विचार नाही, तर तो अधिक व्यापक स्वरूपातून मानवमुक्तीचा विचार करणारा असावा. जागतिक शांतता आणि अणवस्त्रविरहित जग, दारिद्र्य निर्मूलन, हिंसाविरहित कुटूंब, पृथ्वीचे रक्षण आणि संवर्धन, हिंसामुक्त शांततापूर्ण जीवन तिच्या आत्मनिर्भरतेबरोबरच तिचे आर्थिक सक्षमीकरण या सगळ्याचा साकल्याने विचार तिच्या सक्षमीकरणासाठी व्हायला हवा.

शासन, कायदा लॉ अ‍ॅण्ड ऑर्डर, पुरुषी अहंकार, बेगडी सांस्कृतिक मूल्य, पुराणं, भाकडकथा यांनी केलेले महिलांचे ढोंगी उदात्तीकरण हे सर्व तिच्या सक्षमीकरणाच्या आड येत असले तरीही स्वतः तिच्यात अमूलाग्र बदल घडणे व विचाराची दिशा बदलणे अनिवार्य आहे.

एकीकडे स्त्रियांना मतदानाचा हक्क, नोकरीत समान काम समान वेतन, समान संधी, गर्भपाताचा अधिकार, बाळंतपणाची रजा अशा अनेक गोष्टी टप्प्याटप्प्याने होत गेल्या, पण तरीही पुरुषप्रधान संस्कृतीत तिला आत्मभान येणे तिचं मानसिक खच्चीकरण यातून तिला मुक्त करणं गरजेचे आहे. गृहिणी असो वा नोकरदार जर तिने अंतर्मुख होऊन स्वतःचं अलिप्तपणे ॲनालिसिस केलं तर ध्यानात येईल की कमावत्या स्त्रीला तिच्या पैशावर हक्क सांगता येतो? आर्थिक गुंतवणूक कुठे व कशी करावी याचे निर्णय नवरा घेतो. घरातल्या महत्त्वाच्या निर्णयात घरातल्या बाईचे मत विचारात घेतले जात नाही. हे निर्णय स्वातंत्र्य तिला नसणे हा तिच्या सक्षमीकरणाच्या मार्गातील एक प्रमुख अडसर आहे असं प्रकर्षानं वाटतं. तिला समाज व पुरुष बरोबरीने वागवतो का हे महत्त्वाचं.

विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या देशात स्त्री सक्षमीकरणाचे पदर भिन्न असले तरी त्यांची मूलभूत समस्या समान आहे. रोगराई, गरिबी, भूक विस्थापन, युद्ध, नैसर्गिक आपत्ती याचा परिणाम तिच्या सक्षमीकरणाआड येतोच आणि पुढे या समस्यांचे बायप्रॉडक्ट म्हणजे शारीरिक कष्ट, मानसिक असंतुष्टता, असमाधान, अस्वस्थता, चिंता, एकटेपणा, नैराश्य आणि त्यातून उद्‌भवणारे बाईपणाचे आजार देशाच्या सीमारेषा ओलांडून सर्वत्र पसरत आहेत.

गृहिणी आणि नोकरदार दोघीही हाऊस वाइफ सिंड्रोम व करियर वुमन गील्ट सिंड्रोम या कात्रीत सापडल्या आहेत. हाऊस वाईफ सिन्ड्रोम मी घरातच असते, माझा व्यवसाय काय तर घरकाम, मी फक्त नवरा, मुलं, वडीलधारे यांच्या सेवेत असते. मी खूप थकते, माझी चिडचिड होते,



कुणाचं माझ्याकडे लक्ष नाही, मी एकटी पडलीय या भावना तिचा ताबा घेतात. त्यात नवऱ्याचे करिअर, व्यस्त लाइफस्टाइल किंवा देशाटन यामुळे होणारं सेक्स स्टारवेशन यामुळे तिच्या उवा उद्वेगात अधिक भर पडते. अशा अवस्थेत तिच्या सक्षमीकरणाचा विचार कसा करावा.

दुसरीकडे जाहिराती, स्त्रीविषयक मासिके, मालिका, सोशल मीडिया, स्त्री जन्मा ही तुझी कहाणीचे गोडवे गातात. तिचे सार्थक मुलांना वाढवण्यात आणि संसारासाठी खस्ता खाण्यात आहे हेच अंतिम सत्य आहे, असं उच्च रवात सांगितले जाते. मग करियर करणाऱ्या, नोकरी करणाऱ्या, वेगळे काही करू पाहणाऱ्या स्त्रिया या आपलं स्त्रीत्व गमावून बसलेल्या आहेत असे चित्र रंगवण्यात येते. त्यात जर तिने निर्धाराने करियर सोडायला नकार दिला आणि जर घरात काही कमी जास्त झालं तर सारा दोष तिच्या करिअरला दिला जातो आणि मग करियर वुमन गिल्ट सिड्रोम अनेकींना अस्वस्थ करू लागतो.

सतत घरातल्या व मुलांच्या प्रश्नांनी वैतागलेली 'ती' स्वतःची मासिक पाळी, ऐच्छिक व लादलेले गरोदरपण, बाळंतपणाच्या वेदना हे सगळं ती एकीकडे निभावते, तर दुसरीकडे आदर्श स्त्री होण्याच्या नादात एकाच वेळी सगळ्यांना खुश ठेवणं, मुलांवर नको इतका पहारा, अति शिस्त याचा नकारात्मक परिणाम होतोय त्याचा तिने गांभीर्याने विचार करायला हवा.

संसार कसा टिकवावा? नवऱ्याची मजी कशी राखाल? लग्न सांभाळण्याच्या क्लुप्त्या, बाईपणाची सार्थकता असे वरवर ज्ञान वाटणाऱ्या पुस्तकांचे पेव फुटले आहे. त्यातून स्त्रीच ज्ञान आणि सक्षमीकरण कसे साध्य व्हावे याकरिता तिने स्वतःचं आत्मनिरीक्षण करणं अपेक्षित आहे. तिला स्वातंत्र्य हवं आहे, सक्षम व्हायचे म्हणजे नेमके काय? तिला स्वतःची स्वतंत्र ओळख हवी म्हणजे नेमके काय हवे आहे? हे तिचं तिने शोधून ओळखणं क्रमप्राप्त आहे, तरच तिला तिच्या सक्षमीकरणासाठी लढता येईल.

स्त्री-पुरुषांनी एकमेकांना आपापला अवकाश देत एकमेकांना पूरक म्हणून जगण्याची मजा घ्यायला हवी. असं झालं तर दोघेही आपापली ओळख जपत एकमेकांसाठी जगतील ही कल्पनाच किती आशादायी आहे. ही कल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी बाई समजून घ्यावी लागेल आणि ती समजून घ्यायचे असेल तर तिच्याकडे केवळ बाई नाहीतर बाई माणूस म्हणून पहावे लागेल.

निरोगी शरीराबरोबरच आवश्यक आहे. निरोगी मन, सत्यम शिवम सुंदरम हा आपल्या सांस्कृतिक मूल्यातील बहुमूल्य ठेवा, तो मनी वसवला तर आपण आपल्या मनातील गिधाडांना सहज आवारू शकतो, पण प्रॉब्लेम हा आहे की गेंड्याची कातडी असलेल्या विकृत समाजाला केवळ शब्दांचा मार पुरेसं नसतो. तिथे असते कठोर शिक्षेची गरज. म्हणूनच राष्ट्रीय महिला सुरक्षा आयोग, इंडियन पिनल कोडमधील महिला सुरक्षाविषयक विविध कायदे यामुळे आशेचा किरण जागृत झाला आहे. म्हणून स्त्रीनेही जागृत राहून आपल्या हक्कासाठी सजग राहिले पाहिजे. आपल्या सक्षमीकरणाआड कोणी येत असेल तर त्या अन्यायाला वाचा फोडली पाहिजे. कारण अन्याय करणारा जसा दोषी असतो तसा अन्याय सहन करणाराही असतोच.

स्त्रियांचा सार्वजनिक क्षेत्रातील परीघ विस्तारत आहे. तिची रोजची लढाई अधिक गुंतागुंतीची व जीवघेणी झाली आहे. लिंगभेदाला प्राधान्य देणारी समाज व्यवस्था मोडून स्त्री पुरुष समानता हा तिचा घटनादत्त अधिकार तिला बहाल झाला तरच ती सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवेल. आपल्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीचा आवाज जर समाजातील प्रत्येक घटकाने ऐकला तर तो हेच सांगेल की स्त्रीचा आदर करणे तिच्याकरिता परस्पर विश्वास व सामंजस्याचं वातावरण निर्माण करणे. सभोवतालचं वातावरण अधिक मैत्रीपूर्ण करून तिला प्रोत्साहित करणे हे आपले कर्तव्य आहे, कारण प्रत्येक स्त्री ही कुणाची तरी बहीण, मुलगी, बायको आई असतेच हे विसरून कसं चालेल. तिचे सर्वांगीण सक्षमीकरण हे आपलेच तर कर्तव्य आहे.

**-महेंद्र कुरघोडे,** नवीन पनवेल
(मो. क्र. ९८६९२१२९३९)

## ठमाताई अनंता पवार

कर्जत तालुक्यातील जांभिवली येथे वनवासी आश्रम सुरू झाला, तेंव्हा तेथील आदिवासी मुलांना भाकरी करून देण्यासाठी ठमाताई अनंता पवार (वय ६०, मु. गौरकामत, ता. कर्जत) जात असत. त्यावेळी त्यांना आपल्या आदिवासी समाजाच्या दुर्दशेची स्थिती समजली. आदिवासी पुरुषांबरोबर महिलासुद्धा व्यसनाधीन होत्या. पुरुषांच्या बरोबरीने महिला काम आणि मद्यपान करीत असत. मोलमजुरीतून मिळालेला पैसा व्यसनासाठी संपवित असल्याने कुटुंबाची हेळसांड होत असे. तसेच ही सर्व कुटुंबे अंधश्रद्धेच्या मागे असत. हे सारे ठमाताईंनी पाहिले आणि समाजासाठी काहीतरी केले पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न करण्याचे ठरविले.

पूर्णपणे आशिक्षित असल्याने ठमाताई यांनी प्रथम शिकायचे ठरविले. भाकरी करता करता त्यांनी पीठावर रेघोट्या मारून अ, आ, इ, ई..... शिकण्याचा प्रयत्न केला. आश्रमात असलेल्या कुंटे काका-काकू या दाम्पत्याने ठमाताईंना शिकविण्याचे ठरविले. दोन मुले झाल्यानंतर ठमाताईंनी पाटी आणि पेन्सिल हाती घेतली आणि शिक्षणाचे कवाड आपल्यासाठी किलकिले केले.



थोडेफार शिक्षण झाल्यावर त्यांनी समाजसेवेचा वसा हाती घेतला. प्रथम त्यांनी आदिवासी महिलांना व्यसनापासून दूर केले. त्यांना थोडेफार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्यांनतर अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम हाती घेतले. 'महिला शिकली तर पूर्ण कुटुंब शिकते' याचा त्यांना अनुभव आला. ठमाताईंनी आदिवासी महिलांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्या मुलांना शाळेत पाठवू लागल्या. ठमाताईंनी भजनी मंडळे स्थापन करून असंख्य आदिवासी महिलांमध्ये भजनाची आवड निर्माण करून त्यांना परमार्थाकडे नेण्याचा मार्ग खुला करून दिला. ठमाताईंमुळे अनेक आदिवासी मुले-मुली घडल्या काही उच्च पदावर आहेत.

ठमाताईंच्या या कार्यची दखल राज्य शासनाने घेतली व १९९८ साली त्यांना आदिवासी सेवा पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांनतर केंद्र सरकारने २००२ साली तत्कालीन उपराष्ट्रपती भैरवसिंग शेखावत यांच्या हस्ते स्त्रीशक्ती पुरस्कार देऊन गौरवीत केले. तसेच २०१२ साली झी मराठी वाहिनीने आदर्श समाजसेविका म्हणून सन्मानित केले आहे. ठमाताई पवार त्यांना राज्यभरातील अनेक संस्थांनी विविध पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

**शब्दांकन : विजय मांडे**

## कल्पना हिलाल

विधवा आई आणि धाकटी बहिण असलेले आपले कुटुंब चालविण्यासाठी नेरळच्या मोहाचीवाडीमध्ये राहणाऱ्या कल्पना पांडुरंग हिलाल यांनी आपले आयुष्य वेचले आणि स्वतःच्या महत्वाकांक्षा, स्वतःचा आनंद यांना बाजूला ठेवत २० वर्षे सिलेंडर प्रसंगी डोक्यावर वाहून नेले

वडील पांडुरंग हिलाल यांचे २००२ मध्ये आकस्मिक निधन झाले, त्यावेळी कल्पना २० वर्षाच्या होत्या. विधवा आई आणि एका बहिणीला कसे सांभाळायचे अशी चिंता कल्पना यांना सतावत होती. पुरेसे शिक्षण नाही, मग नोकरी कोणाकडे आणि कशी मागायची. त्यामुळे पडेल ते काम करण्याची हिंमत ठेवून कल्पना नेरळ गॅस सर्व्हिस येथे जाऊन तेथील व्यवस्थापकांना भेटल्या. मालकीणबाईंनी त्यांना घरोघरी गॅस सिलेंडर पोहचविण्याचे काम दिले. कोणतेही काम करताना लाज बाळगायची नाही, आचा निश्चय केलेल्या कल्पना हिलाल यांनी जुनी सायकल घेतली आणि त्यावर १७ किलो वजनाचा सिलेंडर ठेवून घरपोच सेवा देण्यास सुरुवात केली.



सायकलवरून सिलेंडर पोहोचण्याचे काम त्यांनी पाच वर्षे केले. त्यानंतर त्यांनी एक जुनी स्कुटर विकत घेतली. त्यामुळे घरपोच सिलेंडर पुरविण्याची क्षमता वाढली. त्या दिवसभरात १५-२०सिलेंडर घरोघरी पोहच करू लागल्या. महिला असल्या तरी कल्पना तिसऱ्या मजल्यावर डोक्यावर सिलेंडर घेऊन जात असल्याने त्यांच्या या कामाचे कौतुक होऊ लागले. आपले हे काम अनेकांना समाधान मिळवून देत असल्याने त्यांनी मागे न पाहता आपल्या कामात २० वर्षे खर्च केली आहेत.

कल्पना हिलाल आता दिवसाला सुमारे ३० हुन अधिक घरी गॅस सिलेंडर पोहचवितात. शिवाय कोणत्याही वेळी फोन आला तरी कुठेही असलेल्या कल्पना हिलाल या अर्ध्या तासात गॅस भरलेली टाकी घेऊन पोहचतात. त्यांचे हे आगळेवेगळे काम समाजाला आदर्शवत आहे. वारकरी पंथाच्या हिलाल या आपल्या आईला घेऊन हरिनाम सप्ताहात सहभागी होतात.


**शब्दांकन : संतोष पेरणे**



## महिला दिन विशेष

## रेखा प्रभाकर मोरे

**१९८०** साली चार मुलींना घेवून रेखा प्रभाकर मोरे यांनी घराच्यात अंगणात टेलरींग प्रशिक्षण वर्ग सुरू केला. आज गेली ४२ वर्षे हा गृहउद्योग सुरू आहे. हहूहळू याचा पसारा वाढत गेला. प्रशिक्षणाला येणाऱ्या महिला, मुलींची वाढती संख्या पाहून रेखा मोरे यांनी अलिबागच्या ठिकरूळ नाक्यावर भाड्याच्या जागेत हा व्यववसाय सुरू केला. प्रशिक्षणाबरोबरच शिलाईचे काम वाढू लागले. कालांतराने भाड्याच्या जागेतून स्वतःच्या मालकीचे दुकाना घेतले. अलिबागमधील ठिकरूळनाका येथे दुकान सुरू आहे. तेव्हा प्रशिक्षित मुलींनाच काम देवून त्यांना अर्थप्राप्तीलचा मार्ग दाखवला. रेखा मोरे यांच्याकडे प्रशिक्षण घेतलेल्यात अनेक मुलीनी, महिलांनी आपला स्वतंत्र व्यसवसाय सुरू केला. त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. काहीं जणींनी स्वतःचे क्लास सुरू केले आहेत. रेखा मोरे यांच्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना रोजगार निर्माण झाला. मागील ४२ वर्षांमध्ये रेखा मोरे यांनी तीन पिढ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम केले आहे. त्यांना रोजगार उपलब्ध झाला. या माहिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम रेखा मोरे यांनी केले आहे.



**शब्दांकन : प्रकाश सोनवडेकर**

## संध्या भडसावळे-देवस्थळे

स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ भडसावळे यांची कन्या असलेल्या संध्या देवस्थळे यांनी आपल्या समाजसेवेच्या आवडीतून असंख्य महिलांचे संसार उभे केले आहेत. एमएस्सीसारखे उच्चशिक्षण घेत वडिलांच्या छत्रात वाढलेल्या संध्याताई, पतीच्या आकस्मिक मृत्यूनंतर एकुलत्या एक डॉक्टर कन्येला संसाराला लावून आता गोरगरीब महिलांना रोजगार निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आघाडीवर आहेत.

कोतवालवाडी ही संस्था आपला देश पारतंत्र्यात असताना उभी राहिली आणि त्या पवित्रभूमीत वास्तव्य करण्याची संधी लहानपणापासून संध्या यांना मिळाली. स्वातंत्र्यसैनिक असलेले आपले वडील कडक शिस्तीचे असल्याने जन्मजात देशसेवा आणि समाजहित यांचे बाळकडू त्यांना मिळाले होते. स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ भडसावळे यांनी कोतवालवाडी संस्था स्थापन करताना मूळ उद्देश नक्की केला होता आणि तो हेतू अजूनही पाळला जात आहे. आदिवासी समाज आणि गोरगरीबांना प्राधान्य देऊन त्यांना पुन्हा त्यांच्या पायावर उभे करण्याचे काम संध्याताई अविरतपणे करीत आहेत. कोतवालवाडीमध्ये म्हणजे गावापासून दूर राहून शिक्षण घेणारे संध्या आणि त्यांची भावंडे ही



उच्चशिक्षण घेतलेली म्हणून आपला नावलौकिक मिळवून आहेत. नेरळ विद्या मंदिरमध्ये दहावीपर्यंत शिक्षण घेऊन नंतर मुंबईत वसतिगृहात राहून संध्या यांनी एमएस्सीपर्यंत शिक्षण घेतले आहे.

विवाहानंतर पुण्यात वास्तव्यास असतानादेखील संध्याताईंनी मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्यात भाग घेतला. तेथील अनेक संस्थांशी असलेले संबंध हे त्यांना आता कोतवाल ट्रस्टमध्ये काम करताना उपयोगी पडत आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या पुण्यातील नामवंत मंडळींना कोतवालवाडीमध्ये आणून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून देण्याचा त्यांचा प्रयत्न समाजाप्रती सर्वस्व अर्पण केल्यासारखा आहे. समाज घडविण्याचे काम करीत असलेल्या संध्याताई यांची एकुलती एक कन्या डॉक्टर झाली आहे. पती वियोगानंतर संध्याताई देवस्थळे यांनी आपला संपूर्ण वेळ कोतवालवाडीसाठी समर्पित केला आहे. समाजातील अल्पशिक्षित तरुणांना रोजगारच्या संधी मिळाव्यात यासाठी या नवदुर्गेने एलअँडटी सोबतच्या करारात आयटीआयचे प्रमाणपत्र कोतवालवाडीमध्ये मिळवून देण्याचे केंद्र सुरू केले. ते केंद्र फारसे यशस्वी झाले नाही, तरीदेखील बांधकाम साईटवरील मेस्त्री आणि तत्सम कामगार निर्माण करण्याचे स्वप्न काही प्रमाणात तेथे यशस्वी झाले आहे.

कोतवालवाडीमध्ये सर्व सोयी सुविधा असाव्यात यासाठी संध्याताई यांनी नक्षत्र बन उभे केले आहे. आपल्या वडिलांची आठवण कायम राहावी, यासाठी त्यांचे वास्तव्य राहिलेले घर ऐतिहासिक ठेवा म्हणून जतन केले आहे आणि ते घर हेरिटेज ठेवून प्रेरणास्थान करण्याचा प्रयत्न केला आहे.

महिलांना उद्योग व्यवसाय करता यावेत, यासाठी संध्याताईंनी कोतवालवाडी ट्रस्टमध्ये काही कोर्सेस सुरू केले आहेत. कोतवालवाडी ट्रस्टच्या महिला विभागात गेल्या आठ वर्षात नर्सिंग, टेलरिंग आदी प्रशिक्षण पूर्ण करून अनेक महिला आपले कुटुंब चालवीत आहेत. महिलांना आर्थिक सक्षम करण्याचे महत्वाचे काम कोतवालवाडी ट्रस्ट करीत असून संध्या भडसावळे-देवस्थळे यांच्या या कार्याची नोंद समाजाने घेतली आहे.

**शब्दांकन : संतोष पेरणे**

## राजश्री बोलके

काही कर्तृत्ववान महिला अशा आहेत की, ज्या प्रसिद्धीच्या झोतात नसतात. कार्य उल्लेखनीय असूनसुद्धा कसल्या प्रकारची अपेक्षा न करता अविरत सेवा करत असतात. आपलं कार्य हेच त्याचं ध्येय्य असतं. त्यातीलच एक म्हणजे राजश्री राजेंद्र बोलके.

राजश्री बोलके यांच्या कार्याची सुरवात २००७ साली रिलायन्स टाऊनशिप येथून झाली. सुरवातीला त्या कामगारांच्या मुलांना ॲबॅकसच्या माध्यमातून शिकवू लागल्या. पुढे २००९ पासून त्यांनी नागोठणे ते पाली येथे क्लास सुरु केले. ॲबॅकस या प्रकारामध्ये सोप्या पद्धतीने गणिते सोडवली जातात. आतापर्यन्त अंतरराष्ट्रीय स्पर्धेत नागोठणे ते पाली येथील विद्यार्थांनी भरघोस बक्षीसे जिंकली आहेत. राजश्री बोलके यांच्याकडे धडे घेतलेले अनेक विद्यार्थी उच्चशिक्षित झाले आहेत.



कोरोना काळात सर्व काही बंद असताना राजश्री बोलके या विद्यार्थ्यांना ऑनलाईन धडे देत होत्या. लहान मुलांनी दिल्लीपर्यंत घेतलेली झेप पाहून कित्येक पालक बोलके यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करतात. ज्या प्रमाणे त्यांनी विद्यार्थी उच्चशिक्षित केले त्या प्रमाणे आपल्या दोन्ही मुलींना उच्च शिक्षण दिले आणि या सर्व गोष्टी करताना मोलाची साथ लाभली ती त्यांचे पती राजेंद्र बोलके यांची. आपल्या पतीच्या पाठिंब्यामुळे शिक्षण क्षेत्रात कार्य करताना एक ऊर्जा मिळत असल्याचे राजश्री या नेहमी म्हणत असतात.

**शब्दांकन : राज वैशंपायन**

# तोतया व्यक्ती उभा करून माणगावमध्ये जमिनीची विक्री

## नऊ आरोपींवर गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

मयत इसमाच्या जागी तोतया इसम उभा करून तसेच त्याचे बनावट पॅनकार्ड तयार करून संगनमताने साखळेवाडी (ता. माणगाव) येथील जमिनीची विक्री करून फिर्यादीची फसवणूक केल्याप्रकरणी नऊ जणांवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




महाड येथील उल्हास टुमणे यांचे काका अरविंद विश्वनाथ टुमणे व उल्हास शंकर टुमणे यांच्या नावे माणगाव तालुक्यातील साखळेवाडी येथे (सर्वे नं.५६ क्षेत्र ५-२०-०) जमीन आहे. त्यापैकी अरविंद विश्वनाथ टुमणे यांचा सन २००८ मध्ये मृत्यू झाला आहे. मात्र त्यांच्या जागी तोतया इसम उभा करून तसेच बनावट पॅनकार्ड तयार करून त्यांची ओळख हेच जमिनीचे मूळ मालक आहेत असे सांगून, मिलिंद चंद्रकांत फोंडके (वय ४८, रा. निजामपूर ता. माणगाव), रवींद्र वसंत भोईर (वय ४०), निसेल रवींद्र भोईर (वय २०, दोन्ही रा. नेरुळ, नवी मुंबई), नितीन चंद्रकांत फोंडके (वय ५०, रा. निजामपूर, ता. माणगाव), केशव गोविंद ओक (रा. बामणगाव, ता. माणगाव), असिफ याकूब दळवी (रा. निजामपूर ता. माणगाव), सखाराम धोंडू मांडवकर (रा. भाले, ता. माणगाव) यांच्यासह एकूण नऊ आरोपींनी संगनमत करून साखळेवाडी येथील (सर्वे नं.५६ क्षेत्र ५-२०-०) जमिनीची विक्री केली. या व्यवहाराची २६ एप्रिल २०१३ रोजी माणगाव येथील दुय्यम निबंधक कार्यालय नोंदणीही केली.

या प्रकरणी यतीन उल्हास टुमणे (वय ४९, रा. काकरतळे, ता. महाड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार माणगाव पोलीस ठाण्यात नऊ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहाय्यक फौजदार श्री. भोजकर करीत आहेत.

## कर्जतमध्ये तरुणीवर बलात्कार; गुन्हा दाखल

**कर्जत : बातमीदार**

लग्नाचे आमिष दाखवून कर्जत भिसेगाव येथील एका तरुणीवर वारंवार शारीरिक अत्याचार करून फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित तरुणावर कर्जत पोलीस ठाण्यात बलात्कार आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भिसेगाव येथील एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून मुद्रे येथील एका तरुणाने १ मे २०२० ते २६ ऑक्टोबर २०२१ या दरम्यान तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले तसेच प्रकरण अंगाशी येत असल्याचे पाहून जबरदस्तीने गर्भपात करण्यास भाग पाडले. त्यानंतर पीडित तरुणीला हाथाबुक्याने मारहाण व शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती.

# नेरळमध्ये पाच घरफोड्या

**कर्जत : बातमीदार**

नेरळ पोलीस ठाण्यात मागील दोन दिवसात पाच घरफोड्यांची नोंद करण्यात आली असून, त्यापैकी दोन घरफोड्या शहरातील मोडकनगर येथील तर एक बाजारपेठ भागातील आहे. एक घटना नेरळ पूर्व भागात तर दूसरी एक घटना ममदापूरच्या नवीन वसाहत भागात घडली आहे.

मोडकनगर येथील मधू अपार्टमेंटमध्ये झा-लेल्या चोरीच्या घटनेत ४४०० रुपयांचे चांदीचे दागिने लंपास करण्यात आले आहेत. तर त्याच भागातील श्री समर्थकृपा अपार्टमेन्टमधील एका घरातून २५ हजार ६०० रुपयांचे सोन्या, चांदीचे दागिने चोरट्यांनी लंपास केले आहेत. नेरळ टेपआळी भागातील दत्तकृपा रेसिडेन्शीमधील घरातून ३२ हजार ९०० रुपयांचे सोन्याचे दागिन, चांदीचे दागिने चोरीला गेले आहेत. ममदापूर नवीन वसाहतीमधील डंकन अपार्टमेंटमध्ये बंद असलेल्या घरातून ६३ हजार रुपयांचे दा-गने चोरीला गेले आहेत. नेरळ पूर्व भागातील गंगानगरमधील मातोश्री बंगला येथील घरातून नऊ हजार रुपयांची रोकड पर्समधून काढून चोरट्यांनी पोबारा केला आहे.


### ग्रामपंचायत गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड
### जाहीर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत गव्हाण १५वा वित्त आयोग फंडातून खालील कामांसाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत, तरी अधिकृत ठेकेदारांनी दि. ०८/०३/२०२२ ते १४/०३/२०२२ पर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास सकाळी ११:०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील. त्या वेळी उपस्थित रहावे. कोणतेही एक अगर सर्वंच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

| अ. नं. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोपर येथे अंतर्गत पाईप लाईन टाकणे. | ७७२७९५/- | ७७२७/- | ५००/- | ३ महिने | १५वा वित्त आयोग (सन २०२१/२२) |
| २ | मौजे कोपर येथील ४ सीटचे सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे. | २९९७३३/- | २९९७/- | ५००/- | ३ महिने | १५वा वित्त आयोग (सन २०२१/२२) |
| ३ | मौजे गव्हाण येथील ४ सीटचे सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे. | २९९७३३/- | २९९७/- | ५००/- | ३ महिने | १५वा वित्त आयोग (सन २०२१/२२) |

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. सदर कामांचे अंदाजपत्रकिय रक्कम ३०००००/- वरील सर्व कामांना नोंदणीकृत (रजिस्टेशन) ठेकेदारांनीच कामाची निविदा भरावी.
३. इसारा रक्कम व निविदा फी रोखीत भरावी लागेल.
४. निविदा फी ना परतावा समजावी.
५. नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल. तसेच पॅनकार्डची झेरॉक्स सोबत जोडणे बंधनकारक राहील.
६. अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
७. निविदा मंजूर केल्यास रूपये १००च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा दयावा लागेल.
८. सूरक्षा अनामत रक्कम ५%, इंन्कमटॅक्स २.३०%, ग्रामपंचायत विकास निधी ५% वर्क इन्शुरन्स् १% अशा रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
९. सूरक्षा अनामत ९० दिवसांनी कामांचा दर्जा पाहून परत मिळेल.
१०. कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतील काम पूर्ण न झाल्यास व दूसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
११. सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करणेचे आहे.
१२. वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.
१३. काम चालू करताना फोटो, काम चालू असताना फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचा फोटो बंधनकारक राहील.
१४. सदर कामाचे बील रक्कम रूपये २,५०,०००/-च्या पुढील रक्कमेवर १% जी.एस.टी तसेच १% सी.एस.टी कर कापणे अनिवार्य आहे. ठेकेदाराकडे जी.एस.टी. व सी.एस.टी. नंबर असणे बंधन कारक राहिल.

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत गव्हाण**

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत गव्हाण**


## गोवंश कत्तलप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**कर्जत :** बातमीदार

तालुक्यातील दामत गावात अवैध कत्तलखान्यावर नेरळ पोलिसांनी शनिवारी (दि. ५) धाड टाकून गोवंश मांसासह दोघांना ताब्यात घेतले आहे.

आरोपीच्या घराच्या परिसरात दोन जनावरांची कत्तल करण्यात आल्याचे आढळले. तेथे ५२ हजार ८०० रुपये किमतीचे २५० किलो गोवंश मांस होते. ते पोलिसांनी जप्त केले.


### पेण नगरपरिषद, पेण
### जाहीर फेर निविदा सूचना-२०२२-२०२३

नगर परिषद क्षेत्रांतील भटक्या श्वानांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देणे या कामासाठी इच्छुक पुरवठादार/कंपनी/व्यक्ति यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | भरावयाचा दर | निविदा फॉर्म फि रक्कम | अनामत रक्कम | कामाचा कालावधी (कामाचे आदेश दिल्यापासुन) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद क्षेत्रांतील भटक्या व उनाड कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे व त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देणे. | प्रतीश्वान दर देणे | रु.५००/- | रु.५०००/- | ६० दिवस |

**कामाच्या अटी व शर्ती :-**

१. निविदा विक्री कालावधी दिनांक ०८/०३/२०२२ ते दिनांक दिनांक.१५/०३/२०२२ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत कार्यालयात (सुट्टीचे दिवस वगळता) मिळू शकतील.
२. निविदा जमा करण्याचा कालावधी दिनांक.१६/०३/२०२२ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत.
३. निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक.१६/०३/२०२२ रोजी सायं.५.०० वाजता अथवा प्रशासकीय सोयीनुसार
४. याबाबतची अधिक माहिती नगरपरिषदेचे आरोग्य विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

दिनांक : ७/०३/२०२२

**सही/-**
मुख्याधिकारी
पेण नगरपरिषद, पेण



### उरण नगर परिषद, उरण
### जाहीर सूचना
### पाणी उकळून व गाळून प्यावे तसेच पाण्याचा वापर काटकसरीने करावा

याद्वारे सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, उरण नगरपरिषदेस एम.आय डी.सी.च्या रानसई धरणातून पाणीपुरवठा केला जातो.

धरणाच्या डेडस्टॉकमधून पाण्याचा उपसा करावा लागत असल्याने गढूळ पाणी येण्याची शक्यता आहे. तसेच एम.आय.डी.सी. मार्फत पाण्याचे शुध्दीकरण केले जात आहे.

तथापी उन्हाळ्याच्या दिवसात पाण्यापासून उद्‌भवणाऱ्या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव टाळणेसाठी नगरपरिषदे तर्फे प्रयत्न केले जात आहेत. परंतु नागरीकांना खबरदारीची उपाययोजना म्हणून पिण्यासाठी पाणी गाळून व उकळून वापरावे ही विनंती.

पाणी जंतुनाशक करण्यासाठी पाण्यात टाकावयाची जंतुनाशके पावडर (टी.सी.एल.) नगरपरिषदेत उपलब्ध आहे.

दर मंगळवारी व शुक्रवारी एम.आय.डी.सी. मार्फत पाणीपुरवठा बंद असल्याने नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा.

दिनांक. २८/०२/२२

जा.क्र.उनप/
पा.पु./३९७६/२०२१-२०२२

**सही/-**
**(संतोष माळी)**
मुख्याधिकारी
उरण नगर परिषद, उरण


# अलिबागमध्ये तेजस्विनी पुरस्कारांचे वितरण

## पाच कर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**अलिबाग : प्रतिनिधी**

चूल आणि मूल या मानसिकतेतून बाहेर पडून महिलांनी आज स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. ही ओळख त्यांच्यासाठी महत्त्वाची आहे. अशा कर्तृत्ववान महिला इतरांसाठीही प्रेरणादायी आहेत, असे मत रायगड जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांनी अलिबाग येथे व्यक्त केले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अलिबाग प्रेस असोसिएशनने सोमवारी (दि. ७) आदर्श पतसंस्थेच्या सभागृहात कर्तृत्ववान महिलांचा तेजस्विनी पुरस्कार देऊन सन्मान केला. या पुरस्कार वितरण सोहळ्यात डॉ. फणसे बोलत होत्या. रायगडच्या उत्पादन शुल्क विभागाच्या पोलीस अधीक्षक किर्ती शेडगे, आदर्श पतसंस्थेच्या संचालिका वर्षा शेठ, अध्यक्ष सुरेश पाटील आणि अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर कार्यक्रमाला उपस्थितीत होते. त्यांच्या हस्ते महिलांना सन्मानित करण्यात आले.

महिलांना शिवणकामाचे धडे देऊन स्वावलंबी बनविणाऱ्या रेखा प्रभाकर मोरे, गणेशमूर्ती कार्यशाळा चालविणाऱ्या सपना अमोल जाधव, साऊंड सर्व्हिस व्यवसायात जम बसवणाऱ्या स्नेहा गणेश कादू, क्रिकेटपटू श्रृती संतोष अडीत आणि दुग्ध व्यवसाय करणाऱ्या वर्षा साखरकर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर



### महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,सा.बां. विभाग, पनवेल

पिनकोड-४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ८३**
**(ई-निविदा) सन २०२१-२२**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील खात्याकडील योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप-** या निविदेमध्ये एकूण १३ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०८.०३.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक २२.०३.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक : ७/०३/२०२२
विमाका/कोवि/२०२१-२०२२/३४०

**सही/-**
कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, पनवेल



Rayat Shikshan Sanstha's

**Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel. District- Raigad.**

Post Box No. 124, Karanjade Village,
Tehsil- Panvel, District- Raigad. 410206
Ph. No. 022-27452561 Email: prinmpascpanvel@yahoo.co.in
Website: www.mpasccollege.edu.in

**Tender Notice**

The Principal, Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel invites tenders for the following Equipment through the website of **MKCL, http://edumart.sets.co.in**

| Equipment | Tentative Estimated Cost | Start Date | Last Date |
|---|---|---|---|
| • Electrochemical Testing System | **8,80,000/-** | **07/03/2022** | **20/03/2022** |

**For more details please refer http://edumart.sets.co.in**

**Principal**
Mahatma Phule A.S.C. College, Panvel

**Secretary**
Rayat Shikshan Sanstha, Satara.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी **मौजे कडाव,** ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री.रूस्तम कावसजी तारापोरवाला यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ५१ | २अ | ०-७५-९० | ६-३० |

यापैकी श्री रूस्तम कावसजी तारापोरवाला यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र
०-४०-० हे.आर.पॉ.

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०७/०३/२०२२

**सही/-**
**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि.रायगड. मो.८१४९९४१८५२



### मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. २ साठी)**

**मुकादमा क्रमांक/ सी.सी./ RGD-३२/२०२१**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल } **वादी**

**विरुध्द**

१) सौ. प्रविता बंडू पाटील
पत्ता :- वलप, पो. पडघे, हनुमान मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०८.
२) श्री. विजेंद्रसिंह छेलसिंह राजपूत
पत्ता :- नीलपार्क, तीसरा मजला, प्लॉट नं.३०४, पायोनियर रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
३) श्री. अनिल शंकर पाटील
पत्ता :- रा. वलप, पो. पडघे, हनुमान मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०८. } **प्रतिवादी**

**दावा रुपये : ५८,७७५/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २२/०३/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल,

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०३/०३/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन, (रा. जि. प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅंड समोर, मु.पो.ता. अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

दिनांक : ७/०३/२०२२
सोबत लवाद दावा पाने

(शिक्का)

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा



### मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. २ साठी)**

**मुकादमा क्रमांक/ सी.सी./ RGD-३५/२०२१**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल } **वादी**

**विरुध्द**

१) सौ. गुलाब सदानंद पाटील
रा. जासई, घर नं. ३१५/ए, विठ्ठल मंदिराजवळ, पो. जासई, ता. उरण, जि. रायगड
२) सौ. परमजीत कौर लखबीरसिंग जोवल
पत्ता- जी१, रुम नं. २, बालसोसायटी, सेक्टर-१०, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड
३) सौ. सुवर्णा समीर कांबळे
रा. जासई, विठ्ठल मंदिराजवळ, पो. जासई, ता. उरण, जि. रायगड ४००७०२ } **प्रतिवादी**

**दावा रुपये : ३६,६१६/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २२/०३/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल,

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०३/०३/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन, (रा. जि. प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅंड समोर, मु.पो.ता. अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

दिनांक : ७/०३/२०२२
सोबत लवाद दावा पाने

(शिक्का)

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा



### मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. २ साठी)**

**मुकादमा क्रमांक/ सी.सी./ RGD-३८/२०२१**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल } **वादी**

**विरुध्द**

१) सौ. सुवर्णा समीर कांबळे
रा. जासई, विठ्ठल मंदिराजवळ, पो. जासई, ता. उरण, जि. रायगड ४००७०२
२) सौ. परमजीत कौर लखबीरसिंग जोवल
पत्ता- जी१, रुम नं. २, बालसोसायटी, सेक्टर-१०, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड
३) सौ. गुलाब सदानंद पाटील
रा. जासई, घर नं. ३१५/ए, विठ्ठल मंदिराजवळ, पो. जासई, ता. उरण, जि. रायगड } **प्रतिवादी**

**दावा रुपये : ३७,९६३/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २२/०३/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल,

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०३/०३/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन, (रा. जि. प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅंड समोर, मु.पो.ता. अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

दिनांक : ७/०३/२०२२
सोबत लवाद दावा पाने

(शिक्का)

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा

# एमसीसी संघ महापौर चषकाचा मानकरी

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप युवा मोर्चा पनवेल शहर कोषाध्यक्ष देवांशू संतोष प्रभाळे यांच्या वतीने भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवसीय महापौर चषक क्रिकेट स्पर्धा शहरातील छत्रपती संभाजी महाराज मैदानात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एमसीसी संघ विजेतेपदाचा मानकरी ठरला, तर बापदेव पाली संघाने उपविजेतेपद पटकाविले. या संघांना सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

या स्पर्धेला महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेविका दर्शना भोईर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहराध्यक्ष रोहित जगताप आदींनी भेट देऊन युवा नेतृत्व देवांशू प्रभाळे यांचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत १६ संघ सहभागी झाले होते. विजेत्या एमसीसी संघाला ५० हजार रुपये व भव्य चषक आणि उपविजेत्या बापदेव संघास २५ हजार रुपये व भव्य चषक देऊन सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला तसेच संतोष प्रभाळे, विशाल प्रभाळे आदी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी युवा कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



# जय हनुमान संघाने केपीएल जिंकली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कोपर येथे जय साई मित्र मंडळाच्या वतीने खारकोपर प्रीमियर लीग (केपीएल) २०२२ ही क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जय हनुमान संघाने विजेतेपद पटकाविले. ट्रॉफी फायटर संघाने उपविजेतेपद मिळविले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ६) विजेत्या संघांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभाला गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, साईचरण म्हात्रे, भाऊ भोईर, जय साई मित्र मंडळाचे निलेश पाटील, धनेश भोईर, रणजीत पाटील, विशाल घरत आदी उपस्थित होते.

स्पर्धेत मालिकावीर हर्षल ठाकूर, उत्कृष्ट फलंदाज राशतुल म्हात्रे, उत्कृष्ट गोलंदाज श्रेयश पाटील आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक प्रफुल्ल घरत यांची निवड करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

भारताचे प्रतिनिधित्व करीत अर्नोल्ड क्लासिक युरोप आणि दुबई क्लासिक येथे झालेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत रौप्यपदक पटकावलेल्या गिरीष पाटील यांचा या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच पुण्यात होणाऱ्या मिस्टर युनिव्हर्स स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा देण्यात आल्या.

# राष्ट्रीय युनिफाईट स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी केली पदकांची लयलूट

**सातारा : प्रतिनिधी**

साताऱ्यातील वाई येथे युनिफाईट वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र व सातारा यांनी आयोजित केलेल्या नवव्या राजस्तरीय युनिफाईट स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. या स्पर्धकांची हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय युनिफाईट स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे.

युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन रायगड या संस्थेत शिहान निलेश भोसले व सेन्साय अनुज भोसले, वरद केणी, रोहित थळी यांच्याकडे युनिफाईट या खेळाचे प्रशिक्षण घेत असलेल्या पनवेल, सुकापूर, आकुर्ली, विचुंबे, आदई, उसर्ली येथील खेळाडूंनी स्पर्धेत विविध वजन गटांत सहभाग घेतला होता. त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून १४ सुवर्ण, नऊ रौप्य, दोन कांस्य अशी एकूण २५ पदके पटकावून पनवेलसह रायगड जिल्ह्याचे नाव उंचावले. स्पर्धेत भोसले व केणी यांनी पंच प्रतिनिधी म्हणून, तर थळी यांनी संघ प्रशिक्षक म्हणून भूमिका बजावली.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास प्रमुख पाहुणे सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी युवराज नाईक, ईशान भोसले, महाराष्ट्र युनिफाईटचे अध्यक्ष संतोष खंदारे, सचिव डॉ. मंदार पनवेलकर, सातारा अध्यक्ष संदीप शिंदे, सचिव नितीन आदी उपस्थित होते. उपस्थितांनी विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले आणि त्यांना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**विजेते खेळाडू**

सुवर्णपदक-प्राची डिगोळकर, कृपाश्री शेटसले, तेजस मोहिते, सार्थक दाभोळकर, नावीन्य साळगावकर, यश गुजांळ, पार्थ निकम, रोहित मालविया, राहुल गुप्ता, करण होळकर, हर्ष धनावडे, वरद कालंगे, प्रणव कांबळे; रौप्यपदक-संस्कृती कोळापटे, अन्वी सणस, तन्मय मोप्रे, फिरोज अन्सारी, श्रीनेश मुळे, साहिल खुलट, सोहम पाटील, रोशन चौगुले, ध्रुव वालकर; कांस्यपदक-जीत माळी, अथर्व कालंगे.

## शेन वार्नच्या आठवणीने पाँटिंगला अश्रू अनावर

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा दिग्गज क्रिकेटपटू शेन वॉर्नचे वयाच्या ५२व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ही बातमी येताच क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंगलाही आपल्या पूर्वीच्या सहकाऱ्याच्या जाण्याचा धक्का बसला.

एका मुलाखतीत पाँटिंग वॉर्नला श्रद्धांजली वाहत होता. यादरम्यान त्याला अश्रू आवरता आले नाहीत आणि तो भावनिक होऊन रडू लागला. पाँटिंग म्हणाला, मला ही बातमी ऐकून धक्का बसला. सकाळी उठल्यावर मला याची माहिती मिळाली. मी माझ्या मुलींना नेटबॉलला घेऊन जावे या विचारात रात्री झोपी गेलो, पण जेव्हा जाग आली तेव्हा सर्व काही बदलले होते. ही बातमी पचवायला मला काही तास लागले. वॉर्न माझ्या आयुष्याचा एक भाग होता.





**पनवेल : जय हनुमान कुस्तीगीर संघाच्या वतीने नितळस येथे रायगड कुस्ती प्रीमियर लीग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा ६ आणि ७ मार्चदरम्यान जांभूळेश्वर मैदानात रंगली. या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी नगरसेवक हरेश केणी, माजी पैलवान बाळाराम काटे, परशुराम गोंधळी, रूपेश पावशे आदी उपस्थित होते.**



**उरण : तालुक्यातील काथे आळीत दीपकशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी श्रीदत्त पुजेचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले तसेच दीपकशेठ ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी शकुंतला ठाकूर, राज ठाकूर, मानस ठाकूर, योगिता ठाकूर, अशोकशेठ ठाकूर, ऋषी ठाकूर, विलास ठाकूर, अविनाश ठाकूर, भरतशेठ ठाकूर, रजनी ठाकूर, पायलट प्राप्ती ठाकूर, प्रतीक ठाकूर, मनसेचे अतुल भगत, संजय पाटील, डॉ. रोशन पाटील, विक्रांत म्हस्कर यांच्यासह कुटूंबीय उपस्थित होते.**

# खारघर प्रीमियर लीगमध्ये बेलपाडा संघ विजेता

**खारघर : रामप्रहर वृत्त**



प्रवीण स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने स्व. काळूराम महादू पाटील यांच्या स्मरणार्थ पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती तथा विद्यमाने नगरसेवक प्रवीण काळूराम पाटील व नगरसेवक रामजी बेरा यांच्या वतीने खारघर परिसरातील गाव आणि शहरातील सर्व खेळाडूंना एकत्रित करून आठ संघांची खारघर प्रीमियर लीग आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत स्व. रमेश काकडे प्रतिष्ठान व्हीआरसीसी बेलपाडा संघाने विजेतेपद (एक लाख रुपये व चषक) पटकाविले. सिद्धी प्रतिष्ठान प्रेमनाथ ११ मुर्बी संघाने (५० हजार व चषक) उपविजेता ठरला.

स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले, तर भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील यांनी स्पर्धेला भेट देत शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत मालिकावीरसाठीचे इलेक्ट्रिक बाईक बक्षीस ओमकार पाटील (खारघर) याने प्राप्त केले, तर उत्कृष्ट फलंदाज ओमकार पाटील (मुर्बी), उत्कृष्ट गोलंदाज विवेक म्हात्रे (ओवे), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक झिशान सैफी ठरले.

या स्पर्धेत ओवे ग्रामपंचायत ४०+ विरुद्ध खारघर ग्रामपंचायत ४०+ असा सामना होऊन यात खारघर संघाने बाजी मारली. उत्तम मोर्बेकर सामनावीर ठरला, तर पनवेल (रायगड) ४०+ विरुद्ध नवी मुंबई (ठाणे) ४०+ या संघांत पनवेल (रायगड) संघ जिंकला. या सामन्यात विश्वास पाटील व सोनिया गायकवाड या दोघांनी अर्धशतक केले. सामनावीर किताब विश्वास पाटील (तोंडरे) यांना देण्यात आला.





**पनवेल : महापालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १९मध्ये विविध ठिकाणी गटारांची कामे सुरू आहेत. सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शहरातील पंचरत्न सर्कलजवळ सुरू असलेल्या गटाराच्या कामांची सोमवारी अधिकाऱ्यांसह पाहणी केली तसेच आवश्यक त्या सूचना केल्या. या वेळी नगरसेवक अनिल भगत, शहर अभियंता संजय कटेकर उपस्थित होते.**




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com